दैनिक
# बेधडक महाराष्ट्र
bedhadakmaharashtra25@gmail.com
RNI NO. MAHMAR/2022/86108
पळसदरी, कर्जत, रायगड, महाराष्ट्र येथून एकाच वेळी प्रसिध्द
Bedhadak Maharashtra
संपादक : अभिजित नारायण दरेकर
■ वर्ष : ०५ ■ अंक : ५५ ■ मंगळवार, २१ एप्रिल २०२६ ■ पाने : ८ ■ किंमत : ५/-

## महिला आरक्षण विधेयक 2029 मध्ये लागू होईल, महिलाच विरोधकांना वठणीवर आणतील, जनमताच्या रेट्याने विरोधकांचे चेहरे उघडे पाडू : देवेंद्र फडणवीस



**मुंबई (बेधडक महाराष्ट्र न्यूज नेटवर्क)** देशातील सामाजिक आणि आर्थिक बाबतीत महत्त्वाचा देश ठरेल, अशी 17 एप्रिलला अपेक्षा होती. महिला आरक्षणाचे विधेयक मंजूर होणार होतं. सर्वजण मदत करतील याला अपेक्षा होती. मात्र डीएमके, एनसीपी शप, समाजवादी, उबाठा , काँग्रेस यांनी महिला मानसिकतेचे प्रदर्शन केलं, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. लोकसभेत महिला आरक्षण विधेयक रद्द झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या खासदार ज्योती वाघमारे,शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे, मंत्री मेघना बोर्डीकर, मंत्री आदिती तटकरे, भाजपच्या आमदार चित्रा वाघ, मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित होते.महिला विधेयकाची विरोधकांकडून भ्रूणहत्या करण्यात आली. आनंदोत्सव देखील त्यानंतर साजरा केला. हे समाजसुधारकांच्या विचारांवर केलेले तांडव होते. महात्मा ज्योतिबा फुले यांची 200 वी जन्मशताब्दी सुरु आहे. परंतु महात्मा ज्योतिबा फुलेंच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम झाले. हे सगळे पक्ष एक्सपोज झाली आहेत, अशी टीका देवेंद्र फडणवीसांनी केली. लोकशाहीत महिला सहभागाचा मृत्यू झाला आहे, हत्यारे विरोधी पक्ष आहेत, असा घणाघातही देवेंद्र फडणवीसांनी केला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, १९७६ ला देशात डिलिमिटेशन झालं. संविधान संशोधन करत १९७१ ची लोकसंख्या फ्रीज ठेवत २००० सालापर्यंत डिलिमिटेशन होणार नाही, असा निर्णय झाला. २००२ साली कमिशन तयार झालं, तेव्हा दक्षिणेवर अन्याय होऊ नये म्हणून २००२ साली २० वर्षांची वाढ दिली. ७१ सालच्या लोकसंख्येवर डिलिमिटेशन झालं. २०२३ साली महिला आरक्षणासाठी संशोधन झालं तेव्हा सेन्सस आणि डिलिमिटेशन लागू करत संशोधन झालं. २०२३ च्या संविधान संशोधनानुसार ही विधेयकं आलीत. सगळी आकडेवारी येईपर्यंत २०२८ उजाडेल. २०२३ ला निर्णय घेतला होता, त्यानुसार डिलिमिटेशन करायचं आणि कुठल्याही परिस्थितीत २०२९ ला महिला आरक्षण लागू होईल आणि महिला निवडून येतील. लोकसभेत ५४३ जागा भारताच्या संसदेत असतील, असं १९७१ साली ठरलं होतं. तेव्हा लोकसंख्या ४५ कोटी होती आणि आता १४० कोटी लोकसंख्या आहे. पिपल्स रिप्रेझेन्टेशन ॲक्टसोबत प्रतारणा होईल. उत्तर आणि दक्षिण वाद संपवण्याचे प्रयत्न या विधेयकात केले होते. लोकशाहीत महिला सहभागाचा मृत्यू झाला आहे, हत्यारे विरोधी पक्ष आहेत. नेहमीच काँग्रेस आणि साथीदारांची अशी प्रवृत्ती राहिली आहे. त्यांनी सातत्याने महिला विरोधी धोरणं घेतली, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, गृहमंत्र्यांनी सांगितलं आम्ही बदल करतो, तुम्ही पाठिंबा द्या. मात्र विरोधकांची बोलती बंद झाली. भाजपवर आरोप केलेत. राजस्थानच्या मुख्यमंत्री, गुजरात, दिल्ली अशा ठिकाणी भाजपने महिला मुख्यमंत्री दिलेत . या लोकांनी कधीही याठिकाणी महिलांना मुख्यमंत्री बनू दिले नाहीत. माझ्या स्तरावरील नेत्याने कोणीही माझ्याबरोबर ओपन डिबेट करावी. माझं चॅलेंज आहे. मात्र, ते करणार नाहीत. ते पळून जातात. आम्ही आता महिलांचे एकत्रीकरण करणार आहोत. लोकशाहीत जनमताचा रेटा यांच्या लक्षात येईल. तेव्हा हे महिला आरक्षणाला पाठिंबा देतील. महिलांना संघटित करण्याचे काम करु. राज्यातून 1 कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार आहोत, जनजागृती करणार आहोत. आम्ही मेळावा बोलावला आहे. तिथे देखील आमच्या मित्र पक्षांना निमंत्रित करु. उबाठा, राष्ट्रवादी शप, आणि काँग्रेसचा महिला विरोधी चेहरा आम्ही उघड करु. महिलांना आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे देखील ते म्हणाले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याबाबत विचारले असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, खरं म्हणजे एखादा व्यक्ती किती खोटं बोलू शकतो, याचं जर ऑलिम्पिक घेतलं, तर राहुल गांधींशिवाय दुसऱ्याला मेडल मिळूच शकत नाही, सगळी गोल्ड मेडल राहुल गांधींनाच मिळतील. संविधान तयार झालं, तेव्हा डिबेट झाल्या. तेव्हा महिला रिप्रेझेन्टेशन संदर्भात बाबासाहेब आंबेडकर चिंतेत होते. आता तेच विचार अनुरुप आल्यानंतर कायदा पाडायचा आणि संविधान जिंकले म्हणायचे, यातून त्यांनी महिलांच्या हक्कांवर घाला घातला आहे. राहुल गांधी यांचा महिलांचा अपमान आणि इतर घटकांचा अपमान करणं हा छंद आहे, अशी टीका त्यांनी राहुल गांधींवर केली.प्रियांका गांधी यांनी केलेल्या आरोपाबाबत विचारले असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी त्यांना दोष देणार नाही, त्या नवीन आहेत. त्या २०२३ नंतर आल्या आहेत.आपण २०२३ साली महिला आरक्षण विधेयक मंजूर केलं तेव्हा डिलिमिटेशन आणि महिला आरक्षण लागू होऊ शकत नव्हतं. प्रियांका गांधी यांना कदाचित हे समजावून सांगितलं नसेल. ओबीसी जनगणना ठरलेली आहे. मोदी सरकारनं जात जनगणना मान्य केली आहे. ओबीसी यांच्याबद्दल इतकं प्रेम होतं तर 1970 नंतर ओबीसी जनगणना करा, असं वारंवार सांगितलं जात होतं मात्र त्यांनी केलं नाही, असे त्यांनी म्हटले. तसेच, सगळ्या राज्यात सारख्या जागा वाढत आहेत. जितके टक्के तिकडे आहेत तितकेच इकडे आहे. मूळात वेगवेगळी कारणं शोधण्याचा हा प्रयत्न आहे. महिला आरक्षण विधेयक २०२९ ला लागू होईल आणि महिला सगळ्यांना वठणीवर आणतील, असे देखील त्यांनी म्हटले.

## अक्षय्य तृतीयेनिमित्त पळसदरीत सत्यनारायण महापूजा व भजन सोहळा उत्साहात संपन्न






**कर्जत (रायगड) :**
अक्षय्य तृतीयेच्या पावन निमित्ताने पळसदरी येथील 'नादब्रह्म व्हिला' येथे आयोजित श्री सत्यनारायण महापूजा व भजनाचा भव्य कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात व उत्साहात संपन्न झाला. रविवार दि. १९ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमाला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

दुपारी ३ ते ४ व सायंकाळी ५ ते ७ या वेळेत श्री भैरवनाथ हरिपाठ मंडळ, हालीवली यांच्या वतीने सत्यनारायण महापूजा विधिवत पार पडली. ह.भ.प. निवृत्ती महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रोच्चार व पूजाविधी करण्यात आले. पखवाजावर ओमकार म्हात्रे तसेच नादब्रह्म पखवाज शिक्षण संस्था, कर्जत यांचे सहकार्य लाभले.

सायंकाळी ७ ते ९ या वेळेत शितलादेवी प्रासादिक भजन मंडळ, कोषाणे यांच्या वतीने भजनाचा कार्यक्रम रंगला. गुरुवर्य पं. रघुनाथजी खंडाळकर यांच्या शिष्या गायिका कु. निकिता मोहन ठोंबरे यांनी सुमधुर गायन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांना पखवाजावर रोहन पाटील व तबल्यावर चैतन्य भागवत यांनी सुंदर साथ दिली.

रात्री ९ नंतर ग्रामस्थ मंडळ पळसदरी-पळसदरीवाडी यांच्या वतीने भजनाचा कार्यक्रम झाला. पखवाजावर गुरुवर्य मधुकर बुवा धोंगडे यांची साथ लाभली. या कार्यक्रमात अनेक गुणीजन कलाकारांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमादरम्यान महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. उपस्थित भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन श्री विशाल निगुडकर व तुकाराम विष्णू निगुडकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. धार्मिक व सांस्कृतिक वातावरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

## एस मराठी न्यूज चे कोकण विभागीय संपादक पत्रकार निलेश लोखंडे यांना रायगड रत्न आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित



महाड तालुक्यातील झुंजार पत्रकार व एस मराठी

नीचे कोकण विभागीय संपादक महाड पत्रकार संघाचेकार्याध्यक्ष मराठी गावचे सुपुत्र श्री निलेश लोखंडे यांना दैनिक महासागरच्या 57 व्या वर्धापन दिनानिमित्त संपादक कृष्णा चांडक व अभिनेत्री जानवी किल्ले कर यांच्या शुभहस्ते रायगड रत्न आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले श्री निलेश लोखंडे हे महाड तालुक्यातील झुंजार व

खाडीपट्ट्यातील एक बुलंद आवाज म्हणून ओळखले जातात त्यांना रायगड रत्न पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल त्यांचे महाड तालुक्यात सर्वत्र अभिनंदन व आनंदनाचा वर्षाव होत आहे

## श्रीवर्धन येथे वन पर्यटन प्रकल्पाच्या माध्यमातून निसर्ग व जैवविविधते बाबत होणार जनजागृती

**जागतिक स्तरावरील 'ब्ल्यू फ्लॅग' मानांकनाच्या धर्तीवर या समुद्रकिनाऱ्याचा कायापालट करण्यात येत आहे. पर्यटकांना जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात, स्थानिकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध व्हाव्यात आणि श्रीवर्धनचे पर्यटन जागतिक नकाशावर झळकावे या दृष्टीने ही कामे प्रगतीपथावर सुरू आहेत.श्रीवर्धनचा पर्यटन वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी आणि येथील निसर्गसौंदर्य पर्यटकांपर्यंत अधिक सक्षमपणे पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

**:- आदिती तटकरे.महिला व बालविकास मंत्री.**

**श्रीवर्धन.(समीर रिसबूड)-** श्रीवर्धन येथील समुद्र किनार्यावर होत असलेल्या वन पर्यटन प्रकल्पामुळे किनाऱ्यावर पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना मिळणार आहे.यामुळे परिसरातील वनसंपदेचे संरक्षण होईल व पर्यटकांना निसर्गाच्या सान्निध्यात शांततापूर्ण अनुभव घेता येणार आहे.स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करुन देणारा आणि भारताच्या पर्यटन नकाशावर श्रीवर्धन शहराला विशेष स्थान मिळवून देणारा वन पर्यटन हा महत्त्वपूर्ण प्रकल्प ठरणार आहे.



श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याला ब्लू फ्लॅग बीच पायलट मानांकन प्रायोगिक तत्त्वावर प्राप्त झाल्यानंतर सदर मानांकन कायमस्वरूपी मिळण्याकरिता करावयाच्या उपाययोजनांच्या पार्श्वभूमी वर श्रीवर्धन निसर्ग पर्यटन ही संकल्पना समोर आली आहे.समुद्रकिनाऱ्यास लगत वनविभागाच्या सर्वे नंबर तीनशे साठ मधील जमिनीवर स्वच्छता व सौंदर्यीकरण करण्याच्या अनुषंगाने तसेच येणाऱ्या पर्यटकांसाठी निसर्ग व जैवविविधते बाबत जनजागृती करण्यासाठी वन पर्यटन प्रकल्प हाती घेण्यात आला. सौंदर्यकरणांतर्गत कमान , सेल्फी पॉइंट , माहिती फलकाचे नियोजन आहे.

या वन पर्यटन मुळे श्रीवर्धन शहराचे समुद्री वादळ वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी एकप्रकारे कवच असलेल्या किनाऱ्यावरील सुरू रोपवन दीर्घकाळासाठी अबाधित ठेवण्यास मदत होणार आहे.भविष्यात श्रीवर्धन येथे वन्यजीव संवर्धन , पक्षी निरीक्षण ( गिधाड , धनेश , समुद्री घार ), समुद्री जैवविविधता ( ऑलिव्ह रिडले कासव) संबंधित पर्यटन आणि जनजागृती वाढविण्याच्या अनुषंगाने विशेष प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट आहे .सदर प्रकल्प उपवनसंरक्षक रोहा शैलेंद्रकुमार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन वनविभाग वनपरिक्षेत्र अधिकारी स्वप्नील चंबुले व टीम मार्फत आकार घेत आहे .

## कर्जत रेल्वे पोलिस ठाण्यात सत्यनारायण महापूजा उत्साहात संपन्न



**कर्जत :** कर्जत लोहमार्ग पोलिस ठाण्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेली श्री सत्यनारायण महापूजा शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात संपन्न झाली. कर्जत रेल्वे स्टेशन येथील फलाट क्रमांक २ वरील लोहमार्ग पोलिस ठाणे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता विधिवत पूजेला सुरुवात करण्यात आली.

या धार्मिक कार्यक्रमाला पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले. मंत्रोच्चार, पूजा विधी आणि आरतीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. उपस्थितांनी श्री सत्यनारायणाच्या पूजेत सहभागी होत श्रद्धेने नमस्कार केला.

कार्यक्रमानंतर दुपारी १२.०० ते ३.०० या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसाद वाटप करण्यात आले, यामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे आयोजन व.पो.नि. श्री. तानाजी खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्जत रेल्वे पोलिस ठाण्याच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या पूजेत ए.सी.पी श्री.नंदराज पाटील व रेल्वे सुरक्षा बलाचे मुख्य निरीक्षक श्री.रणवीर सिंग व कर्मचारी यांची देखील उपस्थिती राहिली.स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अशा धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमुळे पोलिस व नागरिक यांच्यातील संबंध अधिक दृढ होतात, असे मत व्यक्त केले.

## पोटाच्या भुकेने घर सोडून जाणाऱ्या मुलींच्या कुटुंबियांना आयज शेख त्यांनी दिला मदतीचा हात

### कुटुंबियांनी मानले मानवरुपी देवदूत आयज शेख यांचे आभार,



**खोपोलो (बातमीदार) :**
खोपोली शहरातील क्रांतीनगर येथून बुधवारी १५ एप्रिल संध्याकाळी बेपत्ता झालेल्या तीन अल्पवयीन मुली सुरत येथे सापडल्या होत्या.सुरत रेल्वे स्थानकावरून तिन्ही मुलींना खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे व त्यांच्या संपूर्ण यंत्रणा कामाला लावून त्या तिन्ही मुलींना ताब्यात घेऊन सुखरूप त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले होते.

परंतू या तिन्हीही मुलींनी गरिबी व आर्थिक अडचणीला कंटाळून घर सोडल्याची घटना खरोखरच मन हेलावणारी आहे.मोठं कुटुंब असल्याने दोनवेळ जेवण वेळेवर भेटत नसल्याने या मुलींनी घर सोडून जाण्याचा टोकाचा निर्णय घेतला. सदर मुली पोटाच्या भूकेने घर सोडून गेल्याची गंभीर बाब खोपोली शहरातील शिवसेना नेते, सामाजिक कार्यकर्ते तथा दानशूर वेक्तिमत्व समजले जाणारे आयज शेख यांना समजतातच

आर्थिक अडचणीत सापडलेल्या मुलींच्या कुटुंबियांना भेट दिली.समाजाप्रति आपले काही देणे लागते या सामाजिक भावनेतून या मिलींना व त्यांच्या कुटुंबाला मदतीचा हात देण्यासाठी पुढे सरसावले. आयाज शेख यांनी त्या तिन्ही मुलींच्या क्रांतीनगर येथील त्यांच्या राहत्या घरी जावून भेट दिली. मुलींसह त्यांच्या कुटूंबातील सदस्यांना आपल्या सोबत शहरातील हस्तीमल मॉल मध्ये घेवून गेले व त्यांना घरात लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची मदत करुन या गरीब कुटुंबाला मदतीचा आधार देत त्यांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण केला. आर्थिक अडचणीत असणाऱ्या शहरातील गोरगरीब मुलांना ही सर्वप्रकारची मदत केली जाईल असे शिवसेना नेते तथा सामाजिक कार्यकर्ते आयज शेख यांनी यावेळी सांगितले. तसेच या मुलींना आयज शेख यांच्या वतीने एक सायकल भेट दिली जाणार आहे.या गरीबी व आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबियांना निःस्वार्थपणे मदतीचा हात देणाऱ्या मानवरूपी देवदूतांना म्हणजेच सामाजिक कार्यकर्ते आयज शेख यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.आर्थिक अडचणीत मदतीसाठी धावून येणाऱ्या मानवरुपी देवदूतचे म्हणजे आयज शेख यांचे मुलींनी व कुटुंबियांनी आभार मानले.

# संपादकीय

## आमसभा, संयुक्त राष्ट्रांची

संयुक्त राष्ट्रांच्या सहा प्रमुख अंगांपैकी एक अंग. आमसभेत सर्व सभासददेशांना समान प्रतिनिधित्व आहे. ही संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत अंतर्भूत असणाऱ्या सर्व विषयांवर विचारविनिमय करते. त्याप्रमाणे सुरक्षा परिषदेशी चर्चा करते. तिचे दरवर्षी अधिवेशन भरते. दरवर्षी तिच्या अध्यक्षाची निवड होते. संयुक्त राष्ट्रांचे १९३ सदस्य आहेत. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणामध्ये आणि प्रमाणीकरणामध्ये ही कळीची भूमिका निभावते.आमसभेचे अध्यक्ष इतर सभासदांशी चर्चा करून आंतरराष्ट्रीय समुदायासाठी महत्त्वाचे मुद्दे ठरवतात. त्यांवर उच्च पातळीवरची चर्चा घडविणे हे तिचे एक मुख्य कार्य आहे. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्रांत होऊ शकणाऱ्या सुधारणा आणि इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवरही ती चर्चा घडवून आणते. आमसभेची प्रमुख कार्ये.आमसभा सुरक्षा समितीच्या अस्थायी सदस्यांची आणि सामाजिक आर्थिक परिषद तसेच आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या प्रतिनिधींची निवड करते. तसेच संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवाचीही निवड करते.संयुक्त राष्ट्रांचे आर्थिक अंदाजपत्रक पारित करायचे काम आमसभा करते. महासभेने घालून दिलेल्या चौकटीमध्ये महासचिव महासभेचा कर्मचारीवर्ग नेमतात.स्थायी सदस्यांनी लघुसभा नावाची एक अंतरिम समिती स्थापन केली आहे. महासभेच्या सत्रस्थगितीच्या काळात ही लघुसभा कार्य करत असते. त्याच वेळी सुरक्षा परिषदेच्या कायमस्वरूपी सदस्यांमध्ये शांतता आणि सुरक्षेच्या प्रश्नांवर मतैक्य न झाल्यास, २४ तासांत महासभेचे विशेष अधिवेशन बोलावले जाऊ शकते. या अधिवेशनात सामूहिक सैनिकी कारवाईचे निर्णय घेतले जाऊ शकतात.सुरक्षा परिषदेच्या १० अस्थायी सदस्यांची निवड, सामाजिक आणि आर्थिक परिषदेच्या ५४ सदस्यांची निवड तसेच आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या सदस्यांची निवड या बाबतीत महासभेचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या अस्थायी सदस्यांची निवड आमसभा आणि सुरक्षा परिषद करते. महासभेच्या अन्य कर्तव्यांमध्ये अधिकारीवगार्ची निवड आणि वार्षिक अर्थसंकल्पाला मंजुरी देणे यांचा समावेश होतो. आमसभेच्या समित्या : अ) कार्यकारी समित्या : १) निःशस्त्रीकरण आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा समिती. २) आर्थिक आणि वित्तीय समिती. ३) सामाजिक, मानवीय आणि सांस्कृतिक समिती. ४) प्रशासन आणि वार्षिक अंदाजपत्रक समिती. ५) विधी समिती. ६) विशेष राजनैतिक आणि निर्वसाहतीकरण समिती. आ) पूरक समित्या : १) सामान्य समिती, जी उपरोक्त समित्यांमध्ये समन्वयाचे काम करते. २) प्रमाणपत्र समिती, जी प्रतिनिधींच्या प्रमाणपत्रावर विचार करते. याशिवायही गरजेनुसार आमसभेने योग्य त्या वेळी लहान आणि पूरक अशा समित्यांची स्थापना केली आहे. उदा., आंतरराष्ट्रीय दहशतवादासंबंधीची अस्थायी समिती, अंतराळाच्या शांततापूर्ण वापरासंबंधीची समिती, निःशस्त्रीकरण समिती आणि मानवाधिकार समिती इत्यादी. आमसभेची कार्यपद्धती : महासभेच्या अधिवेशनांचे नियमित, विशेष आणि आपत्कालीन असे प्रकार आहेत. नियमित अधिवेशन दरवर्षी सप्टेंबरच्या तिसऱ्या मंगळवारी सुरू होऊन डिसेंबरमध्ये संस्थगित होत असते. पुढे जानेवारी ते ऑगस्टच्या दरम्यान गरजेनुसार विशेष अथवा आपत्कालीन परिस्थितीत अधिवेशन भरवले जाते. सुरक्षा परिषदेच्या आवाहनावरून किंवा महासभेतील बहुमताच्या ठरावावरून महासभेचे विशेष अधिवेशन आयोजित केले जाते. प्रत्येक अधिवेशनाच्या तीन महिने आधी सभासद देशांच्या मतदानाने महासभेच्या अध्यक्षांची निवड होते (२००३ पर्यंत अध्यक्षांची निवड अधिवेशन सुरू होताना होत असे). १९५३ साली निर्वाचित झालेल्या विजयालक्ष्मी पंडित या आमसभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष आणि आजपर्यंतच्या एकमेव भारतीय अध्यक्ष होत.

# ७५३: ७५३ ईसा पूर्व रोम्युलस यांनी रोम स्थापन केले.

रोम्युलस हा रोमचा पौराणिक संस्थापक आणि पहिला राजा होता. विविध परंपरांनुसार, रोमच्या अनेक प्राचीन कायदेशीर, राजकीय, धार्मिक आणि सामाजिक संस्थांची स्थापना रोम्युलस आणि त्याच्या समकालीनांनी केली. जरी यापैकी अनेक परंपरांमध्ये लोककथांचे घटक समाविष्ट असले आणि पौराणिक रोम्युलसच्या मुळाशी ऐतिहासिक व्यक्ती कितपत आहे हे स्पष्ट नसले तरी, त्याच्याशी संबंधित घटना आणि संस्था रोमच्या उगम आणि सांस्कृतिक परंपरांभोवतीच्या मिथकांमध्ये मध्यवर्ती होत्या.पारंपारिक खाते

रोमुलसशी संबंधित मिथकांमध्ये अनेक भिन्न प्रसंग आणि व्यक्तीरेखा आहेत, ज्यात रोमुलस आणि त्याचा जुळा भाऊ रेमस यांचा चमत्कारिक जन्म आणि तारुण्य ; रेमसची हत्या आणि रोमची स्थापना; सबाइन स्त्रियांचे बलात्कार आणि त्यानंतर सबाइनांसोबत झालेले युद्ध; टायटस टॅटियससोबतचा संयुक्त शासनाचा काळ ; विविध रोमन संस्थांची स्थापना; रोमुलसचा मृत्यू किंवा देवत्वप्राप्ती आणि नुमा पॉम्पिलियसचे उत्तराधिकार यांचा समावेश आहे . रोम्युलस आणि रेमस

मुख्य लेखः रोमुलस आणि रेमस

रोमन पौराणिक कथेनुसार , रोम्युलस आणि रेमस हे रिया सिल्व्हिया आणि देव मार्स यांचे पुत्र होते . त्यांचे आजोबा नुमिटोर हे अल्बा लाँगाचे कायदेशीर राजे होते , ज्यांच्यामार्फत हे जुळे ट्रोजन नायक एनियास आणि लॅटियमचा राजा लॅटिनस या दोघांचेही वंशज होते . जुळ्यांच्या जन्मापूर्वी, नुमिटोरचे सिंहासन त्याचा भाऊ अमुलियस याने बळकावले होते , ज्याने नुमिटोरच्या मुलाची किंवा मुलांची हत्या केली आणि रिया सिल्व्हियाला वेस्टल म्हणून समर्पित करून तिला कायमच्या कुमारीत्वाची शिक्षा दिली . जेव्हा रिया गर्भवती झाली, तेव्हा तिने दावा केला की देव मार्सने तिला भेट दिली होती. अमुलियसने तिला तुरुंगात टाकले आणि जुळ्यांच्या जन्मानंतर त्यांना टायबर नदीत फेकून देण्याचा आदेश दिला . पण पावसामुळे नदीला पूर आल्याने, अर्भकांची विल्हेवाट लावण्याचे काम सोपवलेले सेवक तिच्या काठापर्यंत पोहोचू शकले नाहीत आणि म्हणून त्यांनी त्या जुळ्यांना पॅलॅटाईन टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या एका अंजिराच्या झाडाखाली सोडून दिले . पारंपारिक कथेनुसार, एका लांडगीला ते जुळे भाऊ सापडले आणि राजाचा गुराखी, फॉस्टुलस , आणि त्याची पत्नी, अक्का लॅरेंटिया , यांना ते सापडेपर्यंत तिने त्यांना दूध पाजले . ते भाऊ गुराखी आणि डोंगराळ लोकांमध्ये मोठे झाले. अमुलियसचे अनुयायी आणि त्यांचे आजोबा नुमिटोर यांच्या अनुयायांमधील संघर्षात अडकल्यानंतर, फॉस्टुलसने त्यांना त्यांच्या उत्पत्तीबद्दल सांगितले. त्यांच्या मित्रांच्या मदतीने, त्यांनी अमुलियसला सापळ्यात अडकवले आणि त्याला ठार मारले, ज्यामुळे त्यांच्या आजोबांना



सटोर्सा दि पाव्हिया येथील १५ व्या शतकातील भित्तिचित्रातील रोम्युलस आणि त्याचा जुळा भाऊ रेमस

पुन्हा सिंहासनावर बसवले. त्यानंतर त्या राजपुत्रांनी स्वतःचे शहर वसवण्यासाठी प्रवास सुरू केला.

ते टायबर नदीच्या काठावरील टेकड्यांवर परतले , जिथे त्यांना लहानपणी उघड्यावर ठेवण्यात आले होते, परंतु त्यांच्या नवीन शहराच्या जागेवरून त्यांचे एकमत झाले नाही. प्रत्येकाने वेगवेगळ्या टेकडीवर जागा घेतली आणि त्यांच्यापैकी एकाची निवड करण्यासाठी एका शकुनाची वाट पाहू लागले. रेमसला ॲव्हेंटाईन टेकडीवर सहा गिधाडे दिसली, त्यानंतर रोमुलसला पॅलॅटाईन टेकडीवर बारांचा थवा दिसला. रेमसने प्राधान्याच्या आधारावर ॲव्हेंटाईनच्या बाजूने युक्तिवाद केला, तर रोमुलसने संख्येच्या आधारावर पॅलॅटाईनच्या बाजूने युक्तिवाद केला. संघर्ष वाढला आणि रोमुलस किंवा त्याच्या अनुयायांपैकी एकाने रेमसला ठार मारले. या दंतकथेच्या एका वेगळ्या आवृत्तीनुसार, भविष्यवेत्त्यांनी रोमुलसला पसंती दिली, ज्याने भविष्यातील शहराच्या ( रोमा क्वाड्रेटा ) भिंती निश्चित करण्यासाठी पॅलॅटाईन टेकडीभोवती एक चौरस नांगरणी केली . जेव्हा रेमसने आक्रमणकर्त्यांविरुद्ध ती नांगरणी किती अपुरी आहे हे दाखवण्यासाठी उपहासाने त्या नांगरणीवरून उडी मारली, तेव्हा रोमुलसने रागाने त्याला खाली पाडले. दुसऱ्या एका वेगळ्या आवृत्तीनुसार, रेमस आणि फॉस्टुलस एका चकमकीत मारले गेले. शहराची स्थापना

रोमच्या स्थापनेचा उत्सव दरवर्षी २१ एप्रिल रोजी पॅरिलिया उत्सवाने साजरा केला जात असे . रोमुलसने सर्वात आधी पॅलॅटाईनला मुरुस रोमुलीने मजबूत केले , ज्या दरम्यान त्याने देवांना यज्ञ केला. त्याने नांगरलेल्या एका ओळीने शहराच्या सीमा आखल्या, आणखी एक यज्ञ केला आणि आपल्या अनुयायांसह शहर बांधायला सुरुवात केली. रोमुलसने राजा होण्यासाठी लोकांची संमती मागितली. नुमिटोरच्या मदतीने, त्याने त्यांना संबोधित केले आणि त्यांची संमती मिळवली. रोमुलसने ज्युपिटरला यज्ञ आणि प्रार्थना केल्यानंतर आणि शुभशकुन मिळाल्यानंतर राज्याभिषेक स्वीकारला .



क्विरीनसच्या भूमिकेत रोम्युलससह रोमन डेनारियस

रोमुलसने कर आकारणी आणि लष्करी उद्देशांसाठी लोकांना रामनेस , टिटिएन्सेस आणि लुसेरेस या तीन जमातींमध्ये विभागले. प्रत्येक जमातीचे अध्यक्षपद ट्रिब्यून नावाच्या अधिकाऱ्याकडे होते आणि पुढे त्या जमातीची दहा क्युरिया किंवा वॉर्डमध्ये विभागणी करण्यात आली होती , ज्या प्रत्येकाचे अध्यक्षपद क्युरिओ नावाच्या अधिकाऱ्याकडे होते . रोमुलसने लोकांच्या फायद्यासाठी प्रत्येक वॉर्डला जमिनीचा काही भाग देखील वाटप केला. जमाती आणि क्युरियांवर कर कसा आकारला जात होता याबद्दल काहीही माहिती नाही, परंतु लष्करी भरतीसाठी, प्रत्येक क्युरिया शंभर पायदळ सैनिक, ज्याला सेंच्युरी म्हणून ओळखले जात होते , आणि दहा घोडदळ पुरवण्यासाठी जबाबदार होती. अशाप्रकारे प्रत्येक रोमुलियन जमातीने सुमारे एक हजार पायदळ आणि एक सेंच्युरी घोडदळ पुरवले; हे तीनशे घोडदळ सेलेरेस , म्हणजे वेगवान म्हणून ओळखले जाऊ लागले आणि त्यांनी शाही अंगरक्षक दलाची भूमिका बजावली.

प्रमुख कुटुंबांमधून शंभर पुरुषांची निवड करून, रोमुलसने रोमन सिनेटची स्थापना केली . या पुरुषांना त्याने 'पॅट्रेस' म्हणजे शहराचे धर्मगुरू म्हटले; त्यांचे वंशज ' पॅट्रिशियन ' म्हणून ओळखले जाऊ लागले, जे रोममधील दोन प्रमुख सामाजिक वर्गांपैकी एक होते. दुसरा वर्ग, ज्याला ' प्लेब्स' किंवा 'प्लेबियन' म्हणून ओळखले जाते, त्यात सेवक, मुक्त केलेले गुलाम, रोममध्ये आश्रय घेणारे पळून आलेले लोक, युद्धात पकडलेले आणि ज्यांना कालांतराने रोमन नागरिकत्व देण्यात आले होते अशा इतरांचा समावेश होता. शहराच्या वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी, रोमुलसने अर्भकहत्येवर बंदी घातली आणि कॅपिटोलाइन टेकडीवर पळून आलेल्यांसाठी एक आश्रयस्थान स्थापन केले . येथे स्वतंत्र नागरिक आणि गुलाम दोघेही संरक्षणाचा दावा करू शकत होते आणि रोमन नागरिकत्व मिळवू शकत होते.

सबाइन स्त्रियांचे बलात्कार

मुख्य लेखः सबाइन स्त्रियांचे बलात्कार

अधिक माहितीः लॅकस कर्टियसची लढाई

नवीन शहर वसाहतवाद्यांनी भरले होते, ज्यापैकी बहुतेक तरुण, अविवाहित पुरुष होते. आश्रय शोधणाऱ्या पळून आलेल्या लोकांमुळे लोकसंख्या वाढण्यास मदत झाली असली तरी, अविवाहित पुरुषांची संख्या स्त्रियांपेक्षा खूप जास्त होती. रोम आणि शेजारच्या समुदायांमध्ये आंतरविवाह होत नसल्यामुळे, नवीन शहर अखेरीस अयशस्वी ठरले. रोमुलसने शेजारच्या शहरांमध्ये दूत पाठवून रोमन नागरिकांशी आंतरविवाहास परवानगी देण्याचे आवाहन केले, परंतु त्याचे प्रयत्न फेटाळले गेले. रोमुलसने इतर वसाहतींमधून स्त्रिया मिळवण्याची एक योजना आखली. त्याने एका भव्य उत्सवाची आणि खेळांची घोषणा केली आणि शेजारच्या शहरांतील लोकांना उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केले. बरेच लोक आले, विशेषतः सबाइन लोक , जे मोठ्या संख्येने आले होते. पूर्वनियोजित संकेतानुसार, रोमन लोकांनी त्यांच्या पाहुण्यांमधील विवाहयोग्य स्त्रियांना पकडले आणि घेऊन गेले .

संतप्त शहरांनी रोमसोबत युद्धाची तयारी केली आणि जर ती पूर्णपणे एकजूट झाली असती तर त्यांनी रोमुलसला हरवले असते. परंतु सबाइन्सच्या तयारीला कंटाळून, केनिना , क्रस्टुमेरियम आणि अँटेम्ने या लॅटिन शहरांनी त्यांच्या मित्रपक्षांशिवाय कारवाई केली. केनिनाने पहिला हल्ला केला; त्याच्या सैन्याला त्वरीत पळवून लावले गेले आणि शहर ताब्यात घेण्यात आले. केनिनाच्या राजकुमाराला द्वंद्वयुद्धात स्वतः पराभूत करून ठार मारल्यानंतर, रोमुलसने त्याचे चिलखत काढून घेतले, ' स्पोलिया ओपिमा'वर दावा करणारा तो पहिला ठरला आणि त्याने ज्युपिटर फेरेट्रियसचे मंदिर बांधण्याची शपथ घेतली . त्यानंतर अँटेम्ने आणि क्रस्टुमेरियमवर विजय मिळवण्यात आला. त्यांच्या काही लोकांना, विशेषतः अपहरण केलेल्या स्त्रियांच्या कुटुंबांना, रोममध्ये स्थायिक होण्याची परवानगी देण्यात आली. लॅटिन शहरांच्या पराभवानंतर, टायटस टॅटियसच्या नेतृत्वाखाली सबाइनांनी आपले सैन्य जमवले आणि रोमवर चाल केली. त्यांनी किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या रोमन सेनापतीची मुलगी टार्पेया हिला लाच देऊन किल्ल्यावर ताबा मिळवला . किल्ल्याचा ताबा नसल्यामुळे, रोमनांना सबाइनांचा सामना रणांगणावर करणे भाग पडले. सबाइनांनी किल्ल्यातून पुढे कूच केले आणि भीषण लढाई सुरू झाली. जवळच्या लॅकस कर्टियस तलावाचे नाव मेटियस कर्टियस या सबाइन योद्ध्याच्या नावावरून ठेवण्यात आले आहे, असे म्हटले जाते . त्याने माघार घेताना आपल्या रोमन पाठलाग करणाऱ्यांना रोखण्यासाठी आपला घोडा तलावाच्या चिखलात घुसवला होता. लढाईच्या एका निर्णायक क्षणी, सबाइनांच्या आक्रमणासमोर रोमन सैन्य डगमगू लागले. आपली आघाडी तुटू नये म्हणून रोमुलसने ज्युपिटर स्टेटरचे मंदिर बांधण्याची शपथ घेतली. जेव्हा सबाइन स्त्रियांनी दोन्ही सैन्यांच्या मध्ये हस्तक्षेप केला आणि एकीकडे आपल्या वडिलांना व भावांना, तर दुसरीकडे आपल्या पतींना शस्त्रे खाली ठेवून सामंजस्य साधण्याची विनंती केली, तेव्हा अखेरीस रक्तपात थांबला. दोन्ही बाजूंचे नेते भेटले आणि त्यांनी शांतता प्रस्थापित केली.

# दिनविशेष

२१ एप्रिल महत्वाच्या घटना

७५३: ७५३ ईसा पूर्वः रोम्युलस यांनी रोम स्थापन केले. (पारंपारिक तारीख)

१९६०: रिओ दि जानेरो ह्या ब्राझील देशाच्या राजधानी चे उद्घाटन झाले.

१९७२: अपोलो-१६ या अमेरिकन अंतराळयानातून गेलेले जॉन यंग आणि चार्ल्स ड्युक हे अंतराळवीर चंद्रावर उतरले.

१९९७: भारताचे १२ वे पंतप्रधान म्हणून डॉ. इंद्रकुमार गुजराल यांनी सूत्रे हाती घेतली.

२०००: आई-वडिलांच्या संपत्तीत परावलंबी विधवेलाही अधिकार असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आमलात आणला.

२१ एप्रिल जन्म

१८६४: जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांचा जन्म. (मृत्यू: १४ जून १९२०)

१९२२: स्कॉटिश साहसकथा लेखक ॲलिएस्टर मॅकलिन यांचा जन्म. (मृत्यू: २ फेब्रुवारी १९८७)

१९२६: इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) यांचा जन्म.

१९३४: महाराष्ट्र लोकधर्म मराठी संस्कृतीचे जर्मन अभ्यासक डॉ. गुंथर सोन्थायमर यांचा जन्म.

१९४५: भारतीय क्रिकेटपटू आणि अंपायर श्रीनिवासराघवन वेंकटराघवन यांचा जन्म.

१९५०: हिंदी आणि मराठी चित्रपट अभिनेते शिवाजी साटम यांचा जन्म.

१८८२: अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पुरस्कार पर्सी विल्यम्स ब्रिजमन यांचा जन्म (मृत्यू : २० ऑगस्ट १९६१)

१७९०: चिली देशाचे पहिले राष्ट्रपती मॅन्युएल ब्लॅनको एन्कालदा यांचा जन्म (मृत्यू : ५ सप्टेंबर १८७६)

१६५१: भारतीय-श्रीलंकन धर्मगुरू आणि संत जोसेफ वाझ यांचा जन्म (मृत्यू : १६ जानेवारी १७११)

१६१९: केपटाऊन शहराचे संस्थापक जॅन व्हॅन रिबेक यांचा जन्म (मृत्यू : १८ जानेवारी १६७७)

२१ एप्रिल मृत्यू

१५०९: इंग्लंडचा राजा हेन्री (सातवा) यांचे निधन. (जन्मः २८ जानेवारी १४५७)

१९१०: अमेरिकन विनोदकार आणि कादंबरीकार मार्क ट्वेन यांचे निधन. (जन्मः ३० नोव्हेंबर १८३५)

१९३८: पाकिस्तानी कवी आणि तत्त्वज्ञ सर मुहम्मद इक्बाल यांचे निधन. (जन्मः ९ नोव्हेंबर १८७७)

१९४६: ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जॉन मायनार्ड केन्स यांचे निधन. (जन्मः ५ जून १८८३)

१९५२: इंग्लिश राजकारणी सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांचे निधन. (जन्मः २४ एप्रिल १८८९)

२०१३: गणितज्ञ, ज्योतिर्विद आणि अतिवेगाने आकडेमोड करणारी भारतीय महिला शकुंतलादेवी यांचे निधन. (जन्मः ४ नोव्हेंबर १९२९)

२३४: चिनी सम्राट हानचा सम्राट झियान यांचे निधन (जन्मः २ एप्रिल १८१)

२०१०: श्रीलंकन अभियंते आणि नागरी सेवक कनागरतनम श्रीस्कंदन यांचे निधन (जन्मः १२ ऑगस्ट १९३०)

२००६: न्यूझीलंडचे वैमानिक, दुसऱ्या महायुद्धातील फ्लाइंग एस जॉनी चेकेट्स यांचे निधन (जन्मः २० फेब्रुवारी १९१२)

२००५: भारतीय-पाकिस्तानी हॉकी खेळाडू फिनोझ खान यांचे निधन (जन्मः ९ सप्टेंबर १९०४)

१९९६: पाकिस्तानी क्रिकेटपटू आणि लेखक अब्दुल हफीज कारदार यांचे निधन (जन्मः १७ जानेवारी १९२५)

१९८५: ऑस्ट्रियन-अमेरिकन फॅशन डिझायनर, मोनोकिनीचे निमार्ते रुडी गेर्नरीच यांचे निधन (जन्मः ८ ऑगस्ट १९२२)

१९१८: मॅनफ्रेड फॉन रिचथोफेन (द रेड बॅरन) - जर्मन लढाऊ पायलट, ज्यांना ८० हवाई लढाऊ विजयांचे अधिकृतपणे श्रेय दिले जाते. (जन्मः २ मे १८९२)

१८८९: मेक्सिको देशाचे अध्यक्ष सेबॅस्टियन लेर्डो डी तेजाडा यांचे निधन (जन्मः २४ एप्रिल १८२३)

# १९२६: इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) यांचा जन्म.

एलिझाबेथ दुसरी (एलिझाबेथ अलेक्झांड्रा मेरी; २१ एप्रिल १९२६ - ८ सप्टेंबर २०२२) या ६ फेब्रुवारी १९५२ पासून २०२२ मध्ये त्यांच्या मृत्यूपर्यंत युनायटेड किंगडम आणि इतर राष्ट्रकुल राज्यांच्या राणी होत्या . त्या त्यांच्या हयातीत ३२ सार्वभौम राज्यांच्या राज्यकर्त्या होत्या आणि त्यांच्या मृत्यूपर्यंत १५ राज्यांच्या सम्राज्ञी होत्या. त्यांचा ७० वर्षे आणि २१४ दिवसांचा राज्यकाळ हा कोणत्याही ब्रिटिश सम्राटाचा सर्वात मोठा , कोणत्याही सार्वभौम राज्याचा दुसरा सर्वात मोठा आणि इतिहासातील कोणत्याही राज्यकर्त्या राणीचा सर्वात मोठा राज्यकाळ आहे .एलिझाबेथचा जन्म लंडनच्या मेफेअरमध्ये , तिचे आजोबा, राजा जॉर्ज पंचम यांच्या कारकिर्दीत झाला . ती ड्यूक आणि डचेस ऑफ यॉर्क (नंतरचे राजा जॉर्ज सहावे आणि राणी एलिझाबेथ द क्वीन मदर ) यांची पहिली मुलगी होती. १९३६ मध्ये तिचा भाऊ एडवर्ड आठवा याने पदत्याग केल्यावर तिचे वडील सिंहासनावर आरूढ झाले , ज्यामुळे दहा वर्षांची राजकुमारी एलिझाबेथ संभाव्य वारस बनली . तिचे शिक्षण घरीच खाजगीरित्या झाले आणि दुसऱ्या महायुद्धादरम्यान तिने सहाय्यक प्रादेशिक सेवेत सेवा बजावत सार्वजनिक कर्तव्ये पार पाडण्यास सुरुवात केली . नोव्हेंबर १९४७ मध्ये, तिने ग्रीस आणि डेन्मार्कचे माजी राजकुमार फिलिप माउंटबॅटन यांच्याशी विवाह केला. २०२१ मध्ये त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांचे लग्न ७३ वर्षे टिकले . त्यांना चार्ल्स , ॲन , अँड्र्यू आणि एडवर्ड ही चार मुले होती .फेब्रुवारी १९५२ मध्ये जेव्हा तिच्या वडिलांचे निधन झाले , तेव्हा २५ वर्षांची असलेली एलिझाबेथ, युनायटेड किंगडम, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका , पाकिस्तान आणि सिलोन या सात स्वतंत्र राष्ट्रकुल देशांची राणी, तसेच राष्ट्रकुलची प्रमुख बनली. उत्तर आयर्लंडमधील संघर्ष , युनायटेड किंगडममधील अधिकारांचे विकेंद्रीकरण, आफ्रिकेचे वसाहतमुक्तीकरण , आणि युनायटेड किंगडमचा युरोपीय



औपचारिक व्यक्तिचित्र, १९५९

समुदायांमध्ये प्रवेश तसेच त्यानंतरची माघार यांसारख्या महत्त्वपूर्ण राजकीय बदलांच्या काळात एलिझाबेथने एक घटनात्मक राणी म्हणून राज्य केले. जसजसे प्रदेशांना स्वातंत्र्य मिळाले आणि बहुतेक राज्ये प्रजासत्ताक बनली, तसतसे तिच्या राज्यांची संख्या कालांतराने बदलत गेली . राणी म्हणून, एलिझाबेथला तिच्या राज्यांमधील १७० हून अधिक पंतप्रधानांनी सल्ला दिला . तिच्या अनेक ऐतिहासिक भेटी आणि बैठकांमध्ये १९८६ मध्ये चीनला, १९९४ मध्ये रशियाला आणि २०११ मध्ये आयर्लंड प्रजासत्ताकाला दिलेल्या राज्याभेटींचा समावेश होता ; तिने पाच पोप आणि चौदा अमेरिकन राष्ट्राध्यक्षांची भेट घेतली.तिच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या घटनांमध्ये १९५३ मधील तिचा राज्याभिषेक आणि तिच्या रौप्य , सुवर्ण , हीरक आणि प्लॅटिनम महोत्सवांचा समावेश होता . जरी अधूनमधून प्रजासत्ताकवादी भावना आणि तिच्या कुटुंबावर माध्यमांकडून टीका होत असली तरी–विशेषतः तिच्या मुलांच्या विवाहांमधील विघटनानंतर, १९९२ मधील तिच्या ' ॲनस हॉरिबिलिस' (भयंकर वर्ष ) नंतर आणि १९९७ मध्ये तिची माजी सून डायनाच्या मृत्यूनंतर –युनायटेड किंगडममध्ये राजेशाहीला असलेला पाठिंबा आणि तिची लोकप्रियता सातत्याने उच्च राहिली. एलिझाबेथ यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी स्कॉटलंडमधील बालमोरल कॅसल येथे निधन झाले आणि त्यांचा ज्येष्ठ मुलगा चार्ल्स



औपचारिक व्यक्तिचित्र, १९५९

तिसरा हा त्यांचा उत्तराधिकारी बनला.बालप णएलिझाबेथचा जन्म २१ एप्रिल १९२६ रोजी पहाटे २:४० वाजता, तिच्या आईच्या वडिलांच्या लंडन येथील मेफेअरमधील १७



८ मे १९४५ रोजी बकिंगहॅम पॅलेसच्या बाल्कनीमध्ये एलिझाबेथ (सर्वात डावीकडे) आपल्या कुटुंबासोबत आणि विन्स्टन चर्चिल यांच्यासोबत.

ब्रुटन स्ट्रीट या घरी सिझेरियन पद्धतीने झाला . ती प्रिन्स अल्बर्ट , ड्यूक ऑफ यॉर्क (नंतर किंग जॉर्ज सहावा) आणि त्यांची पत्नी, एलिझाबेथ, डचेस ऑफ यॉर्क (नंतर क्वीन एलिझाबेथ द क्वीन मदर) यांची पहिली मुलगी होती. तिचे वडील किंग जॉर्ज पाचवा आणि क्वीन मेरी यांचे दुसरे पुत्र होते आणि तिची आई स्कॉटिश सरदार क्लॉड बोवेस-लायन, स्ट्रॅथमोर आणि किंगहॉर्नचे १४ वे अर्ल आणि त्यांची पत्नी सेसिलिया ( माहेरचे नाव कॅव्हेंडिश-बेंटिंक ) यांची सर्वात लहान मुलगी होती. २९ मे रोजी बकिंगहॅम पॅलेस येथील खाजगी चॅपेलमध्ये यॉर्कचे आर्चबिशप कॉस्मो गॉर्डन लँग यांनी तिचा बाप्तिस्मा केला , आणि तिचे नाव तिच्या आईच्या नावावरून एलिझाबेथ; पाच महिन्यांपूर्वी निधन झालेल्या तिच्या वडिलांच्या पणजीच्या नावावरून अलेक्झांड्रा ; आणि तिच्या वडिलांच्या आजीच्या नावावरून मेरी ठेवण्यात आले. तिने सुरुवातीला स्वतःला जे म्हटले होते, त्यावरून तिच्या जवळच्या कुटुंबाने तिला प्रेमाने लिलीबेट म्हटले, तिचे आजोबा जॉर्ज पंचम, ज्यांना ती प्रेमाने ग्रँडपा इंग्लंड म्हणत असे, ते तिच्यावर खूप प्रेम करत होते, आणि १९२९ मध्ये त्यांच्या गंभीर आजारपणात तिच्या नियमित भेटींमुळे त्यांचे मनोधैर्य वाढले आणि त्यांना बरे होण्यास मदत झाली, असे श्रेय लोकप्रिय माध्यमांमध्ये आणि नंतरच्या चरित्रकारांनी दिले आहे. एलिझाबेथची एकुलती एक बहीण, राजकुमारी मार्गारेट , हिचा जन्म १९३० मध्ये झाला. दोन्ही राजकन्यांची काळजी त्यांची दाई, क्लारा नाईट यांनी घेतली आणि त्यांचे शिक्षण त्यांच्या आई आणि शिक्षिका , मॅरियन क्रॉफर्ड यांच्या देखरेखीखाली घरीच झाले . धड्यांमध्ये इतिहास, भाषा, साहित्य आणि संगीत यावर लक्ष केंद्रित केले जात होते. क्रॉफर्डने १९५० मध्ये एलिझाबेथ आणि मार्गारेटच्या बालपणीच्या वर्षांचे ' द लिटल प्रिन्सेस' नावाचे चरित्र प्रकाशित केले, ज्यामुळे राजघराण्याला खूप दुःख झाले . या पुस्तकात एलिझाबेथचे घोडे आणि कुत्र्यांवरील प्रेम, तिची शिस्तबद्धता आणि तिची जबाबदारीची वृत्ती यांचे वर्णन आहे. इतरांनीही अशाच निरीक्षणांची पुनरावृत्ती केलीः विन्स्टन चर्चिल यांनी एलिझाबेथ दोन वर्षांची असताना तिचे वर्णन एक व्यक्तिमत्व. तिच्यामध्ये एका लहान बाळासाठी आश्चर्यकारक असा अधिकार आणि चिंतनशीलपणा आहे, असे केले. तिची चुलत बहीण मार्गारेट रोड्सने तिचे वर्णन एक आनंदी लहान मुलगी, पण मुळात समजूतदार आणि सुस्वभावी असे केले. एलिझाबेथचे सुरुवातीचे आयुष्य प्रामुख्याने यॉर्क कुटुंबाच्या 145 पिकाडिली ( लंडनमधील त्यांचे टाउन हाऊस ) आणि विंडसरमधील रॉयल लॉज येथील निवासस्थानी व्यतीत झाले. संभाव्य वारस

तिच्या आजोबांच्या कारकिर्दीत, एलिझाबेथ ब्रिटिश सिंहासनाच्या वारसा हक्काच्या रांगेत तिसऱ्या क्रमांकावर होती.

, तिचे काका एडवर्ड, प्रिन्स ऑफ

# साताऱ्याचं जनमत, लोकमत आणि मताचा कौल शिवसेना- राष्ट्रवादीच्या निवडणूक पूर्व युतीलाच होता,



सातारा : शिवसेनेच्या सातारा जिल्ह्यातील नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि नगरसेवक यांचा भव्य सत्कार आणि जाहीर सभा साताऱ्यातील गांधी मैदानावर आयोजित करण्यात आली आहे. या सभेला शिवसेनेचे मुख्यनेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित आहेत. यावेळी साताऱ्याचे पालकमंत्री आणि शिवसेनेचे नेते शंभूराज देसाई यांनी सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीवेळी झालेल्या घडामोडींवर भाष्य केलं. ते म्हणाले साताऱ्याचं जनमत, लोकमत आणि मताचा कौल शिवसेना- राष्ट्रवादीच्या निवडणूक पूर्व युतीलाच होता. सातारा जिल्ह्यात शिवसेना वाढत असून त्याचं कारण एकनाथ शिंदे असल्याचं देखील शंभूराज देसाई म्हणाले. गेल्या काही महिन्यांमध्ये नगरपालिका, जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या. याच्या अगोदर जिल्हा परिषदेत शिवसेनेचे दोन सदस्य निवडून आले होते. शिवसेनेचं तिकीट मिळालं नाही म्हणून विजय पवार आघाडी करुन उभा राहिला. शिवसेनेचे तीन जिल्हा परिषद सदस्य होते. आज आम्हाला तुम्हाला सांगताना आनंद होतो, जिल्हा परिषद सदस्यसंख्या तीन वरुन पंधरावर गेले आहेत. 29 पंचायत समिती सदस्य आहेत, जवळपास 30-32 नगरसेवक आहेत. एक पंचायत समिती सभापती, तीन पंचायत समित्यांमध्ये उपसभापती, एका नगरपालिकेचा नगराध्यक्ष लोकांच्या आशीवार्दानं निवडून आणला आहे. सामान्य जनतेच्या पाठबळावर निवडून आणलेला आहे, असं शंभूराज देसाई म्हणाले.आज जिल्ह्यात शिवसेनेचे ताकद शंभूराज देसाईंमुळं वाढत नाही. शरद कणसेंमुळं वाढत नाही, जिल्हाप्रमुखांमुळं वाढत नाही. सामान्य शिवसैनिक आमच्या सगळ्यांअगोदर आशावादी नेतृत्व एकनाथ शिंदे यांचं वाटतं, असं शंभूराज देसाई यांनी सांगितलं.मी सांगितलं आम्ही 15 जागा निवडून आणल्या. राष्ट्रवादी काँग्रेससोबत आपलं प्रीपोल अलायन्स होतं. जिल्हा परिषदेत बहुमताला लागणाऱ्या 37 जागा निवडून आणल्या. काय राजकारण घडलं, कसं घडलं महाराष्ट्रानं पाहिलं, देशातील चॅनेलनं त्याची दखल घेतली. 37 जागा निवडून येऊन सुद्धा आम्ही तुमच्यासमोर अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती घेऊन येऊ शकलो नाही, आम्ही कुठतंरी कमी पडलो, कशात कमी पडलो याचा उल्लेख करणार नाही. पण, जनमत म्हणाल,लोकमत म्हणाल, मतदारांचा कौल तर तो शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडणूक पूर्व युतीलाच होता. जिल्ह्यानं ती युती स्वीकारली होती. आजही जिल्ह्यानं ती युती स्वीकारलेली आहे. आम्हाला कुणावर टीका करायची नाही, आम्ही कोणाला बाजूला ठेवण्याचा प्रयत्न केलेला नाही, असं शंभूराज देसाई म्हणाले. नगरपालिकेला महायुती करण्याचा प्रयत्न केला अपयश आलं.

# देवेंद्र फडणवीस अभ्यासू अन् हुशार नेते, पण महिला आरक्षणाबाबत दिल्लीतून प्रेशर आलं असेल: सुप्रिया सुळे



संसदेत महिला आरक्षण आणि लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेसंदभार्तील घटनादुरुस्तीचे विधेयक नामंजूर झाल्यानंतर भाजपने काँग्रेससह विरोधी पक्षांना महिला विरोधी संबोधत रान उठवायला सुरुवात केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही, विरोधी पक्षांमुळे लोकशाहीतील महिला सहभागाचा मृत्यू झाला, अशी टीका केली होती. याविरोधात आपण राज्यभरात महिलांच्या विरोधाची लाट निर्माण करुन काँग्रेस पक्षाला त्यांचा निर्णय बदलायला लावू, अशी भूमिका फडणवीस यांनी घेतली आहे. याबाबत बोलताना सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर दिल्लीतून दबाव असल्यामुळे त्यांना तसे बोलावे लागत असेल, अशी टिप्पणी केली. त्या सोमवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या. विरोधी पक्ष हे महिला विरोधी आहेत, असे सांगून काही होणार नाही. मला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून जास्त अपेक्षा होत्या. कारण देवेंद्र फडणवीस हे सुशिक्षित, हुशार आहेत, ते खूप वाचनही करतात. त्यामुळे मुख्यमंत्र्यांकडून माझी अपेक्षा वेगळी होती. पण एनडीए आघाडीतील सर्व पक्षांनाच एक ब्रिफिंग दिले जाते, त्यांना एक नोट पाठवली जाते. ते स्वतःच्या मित्रपक्षांनाही नोट पाठवतात आणि सगळे त्या मुद्द्यावर एकाच सुरात बोलतात. देवेंद्र फडणवीस हे अभ्यासू नेते आहेत. महिला आरक्षण विधेयक हे 2023 मध्येच पास झाले आहे हे देवेंद्र फडणवीस यांना 2000 टक्के माहिती आहे. पण दिल्लीवरुन त्यांना नोट आली असेल किंवा प्रेशर आलं असेल पक्षाची हीच लाईन लावून धरा, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले.नारीशक्ती वंदन अधिनियम जो निर्णय घेतला, तो संसदेत 20 सप्टेंबर 2023 ला एकमताने मंजूर झाला होता. 21 तारखेला हे विधेयक राज्यसभेतही मंजूर झाले. त्यानंतर 28 सप्टेंबर 2023 रोजी राष्ट्रपतींनी त्यावर स्वाक्षरी केली. त्याची अंमलबजावणी 2024 ला झाली पाहिजे होती. आम्ही या क्षणापासून महिला आरक्षण लागू करा, हे ठामपणे सांगतोय. लोकसभेच्या 543 जागांमध्ये 33 टक्के महिलांना लगेच आरक्षण द्या, हा आमचा आग्रह आहे. मुख्यमंत्र्यांना मला विचारायचं आहे, 2023 साली मंजूर झालेले विधेयक 2026 उजाडलं तरी लागू का झाले नाही? डिलिमिटेशन आणि महिला आरक्षणाचा संबंध काय? 50 टक्के जागा प्रत्येक राज्यात वाढवणार असं आम्हाला सांगितले होते. मग ते विधेयकात का नव्हते? मुख्यमंत्री महिला आरक्षणाबाबत खोटं बोलत आहेत, असे मला म्हणायचे नाही. मात्र, यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा करण्याची माझी तयार आहे. मुख्यमंत्री म्हणतील ती जागा आणि वेळ मला मान्य आहे, असे सांगत सुप्रिया सुळे यांनी एकप्रकारे देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांना दिलेले आव्हान स्वीकारले.

# BMC च्या निधी वाटपात 'साटम फॅक्टर'ची चर्चा; अमित साटम यांनी 4 दिवसांआधीचं पत्र काढलं





भाजपचे मुंबई अध्यक्ष आणि आमदार अमित साटम यांच्या मतदारसंघातील नगरसेवकांवर निधीची खैरात केल्याचं समोर आलं होतं. केवळ अमित साटम यांच्या मतदारसंघात निधीची खैरात केल्याने भाजपमध्ये नाराजीचा सूर उमटत असल्याची चर्चा रंगली होती. निधी वाटपाच्या निकषांबाबत आता भाजपमध्येच प्रश्न उपस्थित केले जात होता. या सगळ्या प्रकरणानंतर आता अमित साटम यांनी मुंबई महानगरपालिकेतील स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांना पत्र लिहून निधी वाटपात समतोल राखण्याबाबत निवेदन दिले होते. याबाबत अमित साटम यांनी स्वतः माहिती दिली आहे.

नगरसेवकांना निधी वाटपाबाबत प्रसारमाध्यमांमध्ये आलेल्या काही बातम्यांच्या संदर्भात मी हे स्पष्ट करू इच्छितो की, ही बाब माझ्या निदर्शनास 16 एप्रिलपूर्वीच आली होती. संबंधित सर्व माहितीचा तपशील घेतल्यानंतर मी 16 एप्रिल रोजी स्थायी समितीच्या अध्यक्षांना पत्र लिहिले होते, अशी माहिती अमित साटम यांनी दिली. अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघातील काही नगरसेवकांना देण्यात आलेला अतिरिक्त निधी देण्यात आला असून, तो अतिरिक्त निधी रद्द करून सर्व नगरसेवकांमध्ये समतोल व न्याय्य निधी वाटप करण्यात यावे, अशी मी विनंती केली आहे. ही बाब मी स्वतःहून माझ्या निदर्शनास आल्यानंतर योग्य त्या माध्यमातून त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत कार्यवाही केली. सार्वजनिक निधी वाटपामध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि न्याय्यतेचे तत्त्व राखणे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहे, असं अमित साटम पत्राद्वारे म्हणाले होते. अमित साटम यांच्या मतदासंघातील कोणत्या नगरसेवकाला किती कोटींचा निधी?

वॉर्ड 65 - विठ्ठल बंदेरी- 6 कोटी
वॉर्ड 67 - दीपक कोतेकर- 6 कोटी
वॉर्ड 68 - रोहन राठोड - 9 कोटी
वॉर्ड 69 - सुधा सिंग - 6 कोटी
वॉर्ड 70 - अनिष मकवाणी - 6 कोटी
वॉर्ड 71 - सुनीता मेहता - 6 कोटीगेल्या अनेक वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेवर असलेली शिवसेनेची सत्ता हटवून पालिकेत विराजमान झालेल्या सत्ताधारी भाजपच्या कारभाराची सध्या राजकीय वतुर्ळात जोरदार चर्चा सुरु आहे. मुंबई महानगरपालिकेवर एकहाती आणि संपूर्ण नियंत्रण मिळाल्याने आता भाजप नगरसेवकांना भरभरुन निधी मिळणार, असे अनेकांना वाटले होते. मात्र, भाजपची सत्ता येऊनही पक्षाच्या विशिष्ट नगरसेवकांना निधीवाटपात झुकते माप दिले जात असल्याची कुजबूज सध्या भाजपच्या अंतर्गत वतुर्ळात रंगली आहे.

# सूरतमध्ये गॅस टंचाईमुळे मजुरांचा रोजगार आणि अन्न दोन्ही हिरावून घेतलं,-रोहिणी खडसें





मिडल-ईस्टमधील युद्ध आणि एलपीजी संकटाचा परिणाम भारतातील विविध भागांत आता स्पष्टपणे जाणवू लागला आहे. अनेक कंपन्यांच्या इमारतींना कुलूप लागण्यास सुरुवात झाली असून, दूरवरून आलेल्या मजुरांना पुन्हा आपल्या गावी परतण्याची वेळ आली आहे. सूरतमधील उधना रेल्वे स्थानकावर रविवारी प्रवाशांची प्रचंड गर्दी उसळली होती. उत्तर प्रदेश आणि बिहारकडे जाणाऱ्या गाड्यांमध्ये जागा मिळवण्यासाठी हजारो लोक स्टेशनवर जमा झाले होते. या गोंधळात पोलिसांनी लाठीचार्ज केल्याने चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली होती. गुजरातमधील सूरतची परिस्थिती पाहता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी महाराष्ट्र सरकारला आवाहन केले आहे. लवकरात लवकर परिस्थितीत सुधारणा करा अन्यथा आपल्या शहरांचीही अवस्था अशीच होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

गुजरातमध्ये स्वयंपाकाच्या गॅसच्या कमतरतेमुळे स्ट्रीट फूडची दुकाने, छोटे हॉटेल्स-ढाबे बंद पडल्याने त्यांचे मालक बेरोजगार होऊ लागले आहेत. याशिवाय, यूपी-बिहारमधील कामगार आणि हजारो विद्यार्थ्यांनाही आपल्या घरी परतावे लागत आहे. यामुळे सुरत स्टेशनवर लांबच लांब रांगा लागल्या आहेत. याबाबतचा एक व्हिडिओ रोहिणी खडसे यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे.

# बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध व्हायला हवी होती, पण काही लोकांनी...; पार्थ पवार



बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीने सध्या संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि खासदार पार्थ पवार यांनी "शी बोलताना एक मोठा दावा केला आहे. बारामतीची निवडणूक ही बिनविरोध व्हायला पाहिजे होती. मात्र, काही लोकांनी उमेदवारांना मुद्दाम उभं केलं, असं त्यांनी म्हटलंय. तसेच, आम्ही निवडणुकीला सामोरे जाऊ. उन्हात मतदारांना बाहेर काढण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागतील, असे देखील पार्थ पवार यांनी सांगितले आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी उद्या होणाऱ्या सांगता सभेवर देखील पार्थ पवार यांनी भाष्य केले आहे. निवडणूक बिनविरोध न होण्याबाबत विचारले असता पार्थ पवार म्हणाले की, अनेक लोकांची इच्छा होती की बारामतीची निवडणूक बिनविरोध व्हायला हवी होती. परंतु, निवडणूक बिनविरोध झालेली नाही. काही लोक जे उभे राहिले आहेत त्यांच्या अनेक मागण्या होत्या. काही प्रतिस्पर्धी उमेदवारांना मुद्दाम उभे केले आहे, असा मोठा दावा त्यांनी केला. पार्थ पवारांच्या या विधानामुळे राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे.सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी उद्या होणाऱ्या सांगता सभेच्या नियोजनाबाबत पार्थ पवार यांनी माहिती दिली. ते म्हणाले की, सभेच्या स्थळाची पाहणी सुरू आहे. उद्या सांगता सभा होत आहे. इथे ऊन खूप आहे. राज्यभरातून अनेक लोक उद्या इथे येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उदय सामंत, रामदास आठवले सुप्रिया सुळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते या सभेला उपस्थित राहणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. दरम्यान, बारामती पोटनिवडणुकीतील विजयाचा विश्वास व्यक्त करताना पार्थ पवार यांनी सांगितले की, आम्ही निवडणुकीला सामोरे जाऊ. मतदारांना बाहेर काढण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागणार आहेत. ऊन खूप आहे. उन्हात लोकांना कसं बाहेर काढायचं हा एक मोठा टास्क आहे. आम्ही चांगल्या मतांनी तर शंभर टक्के निवडून येणार आहोत. पण, आम्हाला दोन लाख 70 हजारांचा रेकॉर्ड मोडायचा आहे, असे त्यांनी म्हटले.

# नवनीत राणा, अनिल बोंडे, प्यारे खान यांनी बेजबाबदार वक्तव्य करू नये; चंद्रशेखर बावनकुळे





अमरावतीच्या परतवाडा येथील बहुचर्चित लैंगिक शोषण आणि ब्लॅकमेलिंग प्रकरणाचा मुख्य सूत्रधार अयान अहमद याच्याबद्दल दररोज नवनवीन आणि धक्कादायक माहिती समोर येत आहे. दुसरीकडे याच मुद्द्यावरून राज्याचं राजकारण देखील तापलं आहे. या प्रकरणावर बोलताना भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी केलेल्या जातीयवादी वक्तव्यावर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी जहरी टीका केली होती. नवनीत राणा म्हणजे जातीय विष पसरवण्यासाठी पोसलेली विषवल्ली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तर विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या एकेरी भाषेतल्या टीकेला प्रत्युत्तर देतांना नवनीत राणा यांनी विजय वडेट्टीवार यांना 'हे चिल्लर लोक असल्याचं म्हंटलंय.

एकंदरीत या आरोप-प्रत्यारोपांवर भाजप नेते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाष्य करत पक्षातील नेत्यांना तंबी दिली आहे. संवेदनशील प्रकरणावर बोलतांना नवनीत राणा, अनिल बोंडे, प्यारेखान, विजय वडेट्टीवार यांनी बेजबाबदार वक्तव्य करू नये.परतवाडा सारख्या संवेदनशील प्रकरणावर बोलतांना नवनीत राणा, अनिल बोंडे, प्यारे खान, विजय वडेट्टीवार यांनी बेजबाबदार वक्तव्य करू नये. पोलिसांकडून अधिकृत माहिती घेवूनच या विषयावर बोलावे. माझी सर्वांना विनंती आहे की अमरावतीचे आनंदाचे वातावरण दूषित करू नये. पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली आहे. पोलीस तपासात आणखी अधिकृत माहिती दिली जाईल. असेही अमरावतीचे पालकमंत्री आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच सर्व पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांना संभाव्य दुष्काळ संदर्भात सर्व स्तरावरील उपयोजना सुचवल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर दुष्काळी परिस्थितीसाठी काय उपयोजना करता येईल, या संबंधी विभागांना सूचना द्यायच्या आहे. यासाठी ही बैठक बोलावली आहे. महिला आरक्षण विधेयक पाडून काँग्रेसने भ्रूणहत्येचे काम केले आहे. महाराष्ट्रातील 150 महिलांना विधासभेत जाण्यापासून काँग्रेसने रोखले आहे.

# अजित दादांच्या तपासाला दिरंगाई का? मुख्यमंत्र्यांनाच विचारलं पाहिजे, अमोल मिटकरींचा सरकारला घराचा आहेर





अजितदादा पवार यांच्या अपघाती मृत्यूबाबत सरकारने दहा मे पर्यंत भूमिका स्पष्ट करावी. तसेच दोषींवर कारवाई करावी. अन्यथा सरकारला हे महागात पडणार, असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. तर दुसरीकडे अजित पवारांच्या अपघाताचा तपास करायला सरकार खूप दिरंगाई करत आहे. ही दिरंगाई का करत आहे, हे मुख्यमंत्र्यांना विचारायला पाहिजे. असं म्हणत अमोल मिटकरी यांनी सरकारलाच घरचा आहेर दिलाय.

ज्या पद्धतीने खरात प्रकरणाचा तपास केला जातो त्या पद्धतीने अजित पवारांच्या अपघाताचा तपास का केला जात नाही? की सरकारलाच याचा तपास करायचा नाही, हे एकदा स्पष्ट करावे. असे मत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी केला आहे. अजित दादांसारखा इतका मोठा नेता आपल्यातून निघून जातो आणि एक एफआयआर होऊ शकत नाही? असं म्हणत अमोल मिटकरी यांनी सरकारवर निशाणा साधला आहेअजित पवारांचा तपास व्हावा यासाठी जनआंदोलन उभा करणार असल्याचंही अमोल मिटकरी म्हणालेत. तसेच रोहित पवार यांनी प्रचारादरम्यान भाजपवर निशाणा साधला, यावर देखील भाष्य त्यांनी केलंय. सुनेत्रा पवारांच्या प्रचारासाठी आमदार अमोल मिटकरी बारामतीत आले असता त्यांनी या प्रकरणावर भाष्य करत प्रतिक्रिया दिलीय.सुनेत्रा पवारांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुतीतील इतर नेते उपस्थित होते. उद्या सांगता सभेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित असणार आहेत. जोपर्यंत अजित पवार हयात होते तोपर्यंत अजित पवार जरी भाजपसोबत गेले तरी अजित पवारांनी भाजप नेत्यांना बारामतीत हस्तक्षेप करू दिला नाही. भाजप नेत्यांना कधीही बारामतीत प्रचाराच्या सांगता सभेला येऊ दिल नाही. मात्र, उद्या देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीची सांगता सभा पार पडणार असल्याचे ही मिटकरी म्हणाले.

# शिवसेनेच्या आमदाराने एकनाथ शिंदेंच्या विरोधातच दंड थोपटलं; म्हणाले, जिल्ह्यात शिवसैनिक आहेत कुठे?

साताऱ्यातील राजकारण पुन्हा एकदा तापलं असून शिवसेना शिंदे गटातील कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांनी आज प्रथमच जाहीर प्रतिक्रिया देत मंत्री आणि पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. शंभूराजे देसाई हे मला पहिल्यापासून वेगळी वागणूक देतात. कोणत्याही कार्यक्रमांना मला बोलावलं जात नाही, असा आरोप महेश शिंदे यांनी शी बोलताना केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आपणास कार्यक्रमासाठी बोलावलेच नाही, फोनही आलेला नाही, असा दावा महेश शिंदे यांनी केला आहे. तसेच हा शिवसेनेचा पहिलाच कार्यक्रम नाही की मी जाणार नाही. साहेब मुख्यमंत्री झाल्यापासून माझे फोटो बॅनरवर नसतात, असे म्हणत महेश शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. तर जिल्ह्यात शिवसैनिक आहेत कुठे, असा सवाल करत स्थानिक नेतृत्वालाही महेश शिंदे यांनी टोला लगावला. जिल्हा परिषद निवडणुकीवर बोलताना माझी पत्नी शिवसेनेतून निवडून आली आणि भाजपकडून अध्यक्ष झाली नाही. आम्ही पहिल्यापासून भाजपसोबत काम करत आलो आहोत, असे स्पष्ट करत महेश शिंदे यांनी आपली राजकीय भूमिका मांडली. याचबरोबर पाच वर्ष पालकमंत्रीपद असूनही 30 सदस्यांपर्यंत पोहोचता आलं नाही, असा घणाघात करत पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यावर महेश शिंदेंनी टीका केली. महेश शिंदे यांच्या या वक्तव्यानंतर साताऱ्यातील शिवसेनेतील अंतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर आला असून आता या टीकेला स्थानिक नेते काय उत्तर देणार? आणि पक्षश्रेष्ठी यावर काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.महेश शिंदे हे शिवसेनेचे साताऱ्यातील कोरेगावचे आमदार जि.प.निवडणुकीत पत्नी प्रिया महेश शिंदे भाजपकडून विजयी.

# मला पहिल्यापासून वेगळी वागणूक, एकनाथ शिंदेंच्या सभेचं निमंत्रणही नाही...; शिंदे गटाचे आमदार महेश शिंदें



सातार्‍यात होणार्‍या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेचं निमंत्रण मला मिळालं नाही. त्यामुळे मी या कार्यक्रमाला येणार नाही. असं स्पष्टीकरण कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांनी दिलं आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई हे मला पहिल्यापासून वेगळी वागणूक देतायत. कोणत्याही कार्यक्रमांना मला बोलावलं जात नाही. असा थेट आरोप देखील आमदार महेश शिंदे यांनी केला आहे. कोरेगावमध्ये शिवसेना आणि भाजपची युती होती. 2019 मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मला शिवसेनेच्या चिन्हावर लढायला सांगितले, त्यामुळे मी शिवसेनेतून लढलो. हे सांगायला देखील महेश शिंदे विसरले नाहीत. परिणामी आता सातार्‍यातील अंतर्गत नाराजी अधिक उफाळणार असल्याचे चिन्ह आहे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आजच्या कार्यक्रमात महेश शिंदे व्यासपीठावर दिसणार का? ते कार्यक्रमात हजेरी लावणार का? की सातार्‍यातील अंतर्गत नाराजी आणखी तीव्र होणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आजच्या सातारा दौर्‍याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. आज अंगापूर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नागरी सत्कार होणार आहे. त्यानंतर कार्यकर्त्यांसोबत बैठक पार पडेल आणि नंतर सातार्‍यातील ऐतिहासिक गांधी मैदानावरून ते शिवसैनिक आणि सातारकरांना संबोधित करणार आहेत. मात्र या दौर्‍यापेक्षा जास्त चर्चा रंगली आहे ती कोरेगावचे आमदार महेश शिंदे हे सत्कार समारंभाला आणि जाहीर सभेला उपस्थित राहणार का? असा प्रश्न पडण्यामागील कारण म्हणजे आमदार महेश शिंदे यांच्याशी संपर्क होत नाहीये. त्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

अशातच, शिवसेनेतील नेत्यांनी त्यांना कार्यक्रमासाठी बोलावल्याचे सांगितले जात असले, तरी ते येणार की नाही याबाबत अद्याप स्पष्टता नाही. गेल्या काही दिवसांपासून महेश शिंदे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात दुरावा वाढल्याच्या चचार्ही सुरू आहेत. त्यामुळे आजच्या कार्यक्रमात महेश शिंदे व्यासपीठावर दिसणार का? ते हजेरी लावणार का? की सातार्‍यातील अंतर्गत नाराजी आणखी तीव्र होणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र याचे उत्तर आता काही तासांत स्पष्ट होणार आहे.

# 'घरं कशी मिळतात बघतो, तू घुसखोर आहेस का?, इथूनच उचलतो', म्हाडाच्या संजीव जयस्वालांची रहिवाशांच्या बैठकीत मुजोरी



मोतीलाल नगरमधील पुर्नविकास प्रकल्पाच्या सार्वजनिक बैठकीत नागरिकांशी बोलताना म्हाडा प्राधिकरणाचे सीईओ संजीव जयस्वाल यांनी धमकी दिल्याचे आणि धार्मिक तेढ उत्पन्न होईल, असे वक्तव्य केल्या आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. मोतीलाल नगरमधील सार्वजनिक बैठकीत नागरिकांशी बोलताना झालेल्या वादानंतर म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्याविरोधात प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. बैठकीदरम्यान नागरिकांना धमकी दिल्याचा आरोप करत तसेच धार्मिक तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्याचा आरोप करत 37 सदस्यांनी स्वाक्षरी केलेली पाच पानी तक्रार गोरेगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या रहिवाशांनी आम्हाला प्रकल्पावर धमकावणारा अधिकारी नको, अशी भूमिका घेतली आहे.

मोतीलाल नगरमधील सार्वजनिक बैठकीत पुनर्विकासासंदर्भात नागरिकांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर वाद निर्माण झाला. याचदरम्यान संजीव जयस्वाल यांनी नागरिकांशी आक्षेपार्ह भाषेत संवाद साधत धमकीवजा वक्तव्य केल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. तसेच बैठकीत केलेल्या काही वक्तव्यांमुळे धार्मिक तेढ निर्माण होईल, असा दावा करत त्याबाबतही तक्रारीत उल्लेख करण्यात आला आहे. या तक्रारीत बैठकीतील संपूर्ण घटनाक्रम नमूद करण्यात आला असून, जयस्वाल यांच्या वक्तव्यामुळे सामाजिक सलोखा बिघडू शकतो, अशी भीती तक्रारदारांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे केवळ आक्षेपार्ह वक्तव्य नव्हे, तर धमकी आणि धार्मिक तेढ निर्माण करण्याच्या आरोपांमुळे या प्रकरणाला अधिक गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे. दरम्यान, 37 सदस्यांच्या स्वाक्षरीसह दाखल झालेल्या या तक्रारीमुळे मोतीलाल नगरमधील वाद आता थेट पोलीस तपासाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. गोरेगाव पोलीस या तक्रारीवर काय भूमिका घेतात आणि पुढे कोणती कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या माध्यमातून मोतीलाल नगरचा पुनर्विकास होत आहे. या प्रकल्पाचा आराखडा कंत्राटदार असलेल्या अदानी समूहाकडून तयार करण्यात आला आहे. मोतीलाल नगरमधील रहिवाशी 2400 चौरस फुटांच्या घरासाठी आग्रही आहेत. मात्र, म्हाडाने ही मागणी मान्य केली नव्हती. शुक्रवारी अदानी समूहाने तयार केलेल्या पुनर्विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी काही रहिवाशांनी 2400 चौरस फुटांच्या घरांच्या मागणीचे फलक दाखवण्यास सुरुवात केली. त्यामुळे संजीव जयस्वाल संतापले. त्यांनी रहिवाशांना थेट धमकावण्यास सुरुवात केली. फलक दाखवणार्‍या एका दाढीवाल्या तरुणाकडे पाहून त्यांनी म्हटले की, 'तू घुसखोर आहेस का? तुझे आयकार्ड दाखव. तू घुसखोर असशील तर तुला येथूनच उचलेन', असे संजीव जयस्वाल यांनी म्हटले. एवढेच नव्हे तर जयस्वाल यांनी पोलिसांना संबंधित तरुणाला ताब्यात घ्यायला सांगितले.यानंतरही संजीव जयस्वाल धमकीच्या स्वरातच नागरिकांशी बोलत राहिले. त्यांनी आवाज चढवत म्हटले की, ठीक आहे, तुम्हाला पुनर्विकास नको ना, मी गौतम अदानींना तसे सांगतो. तुम्ही बैठकीचे इतिवृत्त परस्पर जाहीर करता, तुमच्याविरोधात मी पोलिसांत तक्रार दाखल करेन. ज्यांनी घरे भाड्याने दिली असतील, त्यांना घरे मिळणार नाहीत. तुमची घरं भाडोत्र्यांच्या नावावर करतो. तुमच्या घरांचे हस्तांतर कसे होते, ते मी पाहतो. अनधिकृत बांधकाम केले आहे का, याचे सर्वेक्षण मी सुरु करेन, किती अनिवासी क्षेत्र वाढवले आहे, हे पाहायला लावू नका, असे संजीव जयस्वाल यांनी म्हटल्याचा आरोप आहे. यानंतर रहिवाशांनी पोलीस ठाण्यात जाऊन संजीव जयस्वाल यांच्याविरोधात जातीय तेढ पसरवल्याचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

# फडणवीसांच्या कारकीर्दीत मुंबई, महाराष्ट्राचा 'उडता महाराष्ट्र' झालाय; संजय राऊत



महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर झाले. एकूण 540 सदस्यांपैकी 528 सदस्यांनी मतदान केले. विधेयकाच्या बाजूने 298 आणि विरोधात 230 मतं नोंदवली गेली. यावर आता राजकीय वतुर्ळातून अनेक प्रतिक्रिया समोर येत आहेत. याच पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पत्रकार परिषद घेणार आहेत. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय. तसेच महाराष्ट्रातील वाढत्या ड्रग्जच्या प्रकरणावरूनही त्यांनी मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधलाय.

संजय राऊत म्हणाले की, मुख्यमंत्री पत्रकार परिषद घेऊन आमचा निषेध करणार आहेत. तुम्ही स्वतःचाच निषेध करा. मी काल म्हणालो की, पंतप्रधानांनी या देशाची माफी मागायला पाहिजे. उद्या देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात काही चुकीचे विधान केले तर त्यांना देखील माफी मागावी लागेल. 2023 साली सवार्नुमते मंजूर झालेला कायदा जो तुम्ही लागू केलेला आहे, राष्ट्रपतींनी त्यावर सही केलेली आहे आणि आता तुम्ही कसले डमरू वाजवत बसलेले आहात? तुम्ही कोणाला फसवत आहात? मग 2023 सालच्या ट्विट बद्दल देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागितली पाहिजे की माझं ट्विट खोटं आहे, असा हल्लाबोल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केला. संजय राऊत पुढे म्हणाले की, महिला आरक्षणासंदर्भात तुम्ही जे मिस कॉल दिले, त्याला आम्ही सर्वांनीच पाठिंबा दिला. कारण तुम्ही 2023 सालचा तो कायदा लागू केला होता ना. मग आता का फडफडत आहात? तुमची नेमकी समस्या काय आहे? तुम्हाला कोणता मानसिक आजार जडला आहे? हे आम्हाला कळू द्या. या लोकांना खोटं बोलण्याचा राष्ट्रीय आजार झालेला आहे. पंतप्रधान खोटं बोलतात. मग गृहमंत्री खोटं बोलतात, त्यानंतर राज्यातील मुख्यमंत्री खोटं बोलतात. मग त्यांच्या पक्षाची नारी शक्ती खोटं बोलते, हा आजारच आहे, असे त्यांनी म्हटले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला जे संबोधित केले. त्यावर विरोधी पक्षाकडून आचारसंहिता भंगाचा आरोप केला जात आहे. याबाबत निवडणूक आयोगाकडे विरोधी पक्ष तक्रार करणार का? असे विचारले असता संजय राऊत म्हणाले की, निवडणूक आयोग त्यांचे हस्तक आहे. ज्ञानेश कुमार यांना डीलिमिटेशन आयोगाचे अध्यक्ष करणार होते. त्यांच्या घरी भाजपाचा झेंडा फडकत आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून आम्ही कोणती अपेक्षा करणार? निवडणूक आयोग म्हणजे भाजपचा पदाधिकारी आहे. निवडणूक आयोग लोकशाहीला फा मारतो. भारताचा निवडणूक आयोग हा भाजपचा निवडणूक आयोग झालेला आहे. तो संविधान आणि लोकशाहीला फा मारतो, असा म्हणत त्यांनी निवडणूक आयोगावर हल्लाबोल केला. संजय राऊत पुढे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांच्या कारकीर्दीत मुंबई, महाराष्ट्राचा 'उडता महाराष्ट्र' झाला आहे. आधी उडता पंजाब होता, बरेच काही उडत होते. सध्या महाराष्ट्राच्या राजधानीची अवस्था ही ड्रग्स कॅपिटल म्हणून झाली आहे. महाराष्ट्रात काय काय उडतंय, इकडे खरात बाबा उडतोय. तिकडे अजून काय उडतंय. तुम्ही आंदोलन काय करताय फडणवीस? या सगळ्याकडे लक्ष द्या. तरुण पिढी बरबाद होत आहे. नारीवंदन तुम्ही करत आहात. यावर कारवाई करा तुम्हाला या माता भगिनींचे पुण्य लागेल, असे देखील त्यांनी म्हटले.

# हा वाद माझ्या आटोक्याबाहेर'; चंद्रपुरातील मुनगंटीवार-जोरगेवार वादासमोर भाजप प्रदेशाध्यक्षांनी टेकले हात



चंद्रपूर भाजपमधील गटबाजी आणि अंतर्गत वाद आता शिगेला पोहोचला असून, दिग्गज नेते सुधीर मुनगंटीवार आणि किशोर जोरगेवार यांच्यातील संघर्ष सोडवण्यात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनीही आपली हतबलता व्यक्त केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. चंद्रपुरातील वाद माझ्या आटोक्याबाहेर असून, आता याचा निर्णय थेट दिल्लीतूनच घेतला जाईल, असे संकेत चव्हाणांनी नागपुरातील भेटीत दिल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे.नुकत्याच पार पडलेल्या चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या झोन समिती आणि महिला बालकल्याण समितीच्या निवडणुकांमध्ये भाजपला मोठा धक्का बसला. संख्याबळ अनुकूल असतानाही मुनगंटीवार-जोरगेवार वादामुळे भाजपला पराभवाचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर आमदार किशोर जोरगेवार यांनी शुक्रवारी संध्याकाळी नागपूर गाठून 17 समर्थक नगरसेवकांसह प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली.या भेटीदरम्यान रवींद्र चव्हाण यांनी चंद्रपुरातील घडामोडींवर स्पष्ट नाराजी व्यक्त केली. यावेळी रवींद्र चव्हाण यांनी चंद्रपुरातील वाद हा माझ्या आटोक्याबाहेर आहे. चंद्रपुरात कोणताही नेता निरीक्षक म्हणून जाण्यास तयार नाही. त्यामुळे आता चंद्रपुरातील निर्णय हे दिल्लीतच घेतले जातील. आमच्याकडे आलेले प्रत्येक विषय आम्ही दिल्लीला पाठवू आणि तिथूनच यावर निर्णय घेतल्या जाईल, असं सांगत आपली हतबलता दर्शवल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच माजी राज्यमंत्री मदन येरावार यांची चंद्रपूर भाजपच्या निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, मुनगंटीवार आणि जोरगेवार यांच्यातील टोकाच्या संघषार्मुळे त्यांनी चंद्रपुरात येण्याऐवजी आपल्या पदाचा राजीनामा देणे पसंत केल्याची माहिती समोर आली आहे. सुधीर मुनगंटीवार हे पक्षातील अत्यंत ज्येष्ठ नेते आहेत. खुद्द रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक नेत्यांनी मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात काम केले आहे. त्यामुळे मुनगंटीवार यांच्या विरोधात किंवा त्यांच्याशी संबंधित वादात पडायला राज्यातील कोणताही नेता तयार नसल्याचे चित्र सध्या भाजपमध्ये पाहायला मिळत आहे. या सर्व प्रकारामुळे चंद्रपूर भाजपमधील पेच अधिकच वाढला आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये यात्रेकरुंच्या बसचा भीषण अपघात; 20 ठार 30 जखमी, प्रशासन घटनास्थळी



श्रीनगरः जम्मू-काश्मीरमध्ये यात्रेकरुंच्या बसचा भीषण अपघात झाला असून या दुदैवी घटनेत 20 प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. उधमपूरमध्ये झालेल्या बस अपघाताने संपूर्ण देशाला हादरवून सोडले असून रामनगरच्या कागोत परिसरात ही बस अनियंत्रित झाल्याने पलटी झाली. या दुर्घटनेत बसमधील 20 यात्रेकरु ठार झाले असून 30 प्रवाशी जखमी झाल्याची माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत मदत आणि बचाव कार्य सुरू आहे, अपघातातील जखमींना जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह काँग्रेस नेत्या प्रियांका गांधींनी देखील घटनेवर दुःख व्यक्त केलंय.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यात्रेकरुन प्रवाशांची बस रामनगरहून उधमपूरला जात होती, त्याचवेळी जालो क्षेत्राजवळ चालकास बस अनियंत्रित होऊन हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार बसचे टायर फुटल्याने आणि वेगामुळे बस अनियंत्रित होऊन पलटी झाली. मात्र, अपघाताची नेमकी कारणे, आणि सखोल माहिती घेण्याचं काम पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, या घटनेवर देशभरातून हळहळ व्यक्त होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उधमपूर अपघाताच्या घटनेवर शोक व्यक्त केला. ''या दुर्घटनेत लोकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो, अपघातामधील जखमी लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना 2 लाख रुपये आणि जखमींना 50 हजार रुपयांची मदत देण्यात येईल, असे ट्विट पंतप्रधान मोदींनी केले आहे.

# देशाचा राजा खुर्चीवर कायम राहील, पण...; भेंडवळच्या घटमांडणीत कोणकोणते भाकीत वर्तवले?



बुलढाण्यामधील भेंडवळच्या घटमांडणीचा अंदाज आज जाहीर करण्यात आला. सुमारे 370 वर्षांपासूनची असलेली भेंडवळच्या घट मांडण्याची परंपरा आजही कायम आहे. काल अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर सूर्यास्ताच्या वेळी घटमांडणी करण्यात आली व आज सकाळी सूर्योदयावेळी या घटमांडणीचे निरीक्षण करून वर्षभराचे पीक पाणी पाऊस राजकीय व देशाच्या संरक्षण स्थितीबद्दलचे अंदाज जाहीर करण्यात आले.

घट मांडणीतून निघालेल्या निष्कषार्नुसार देशाचा राजा म्हणजेच पंतप्रधान हे त्यांच्या खुर्चीवर कायम राहतील. मात्र ते तणावात राहतील. तर देशाची संरक्षण स्थिती ही कमकुवत राहील संरक्षण खात्यावर मोठा ताण असेल असाही अंदाज भेंडवळच्या घटमांडणीतून समोर आला आहे. शेतकर्‍यांसाठी यंदा पुन्हा अडचणीच वर्ष ठरू शकतो. यंदा सर्व पिकांवर रोगराईचं प्रमाण जास्त असल्याचा निष्कर्ष यातून निघाला आहे. मात्र कापूस तीळ अशा प्रकारची पीक भरपूर होतील व त्यांना भावही मिळेल, असा निष्कर्ष भेंडवळच्या गट मांडणीतून निघाला आहे. यंदाच्या गट मांडणीतून निघालेले प्रमुख निष्कर्ष-पिकांवर रोगराईचं प्रमाण जास्त असेल.

कापूस, तांदूळ पिकाचे उत्पन्न भरपूर.

ज्वारी , तूर, मुंग, उडीद, मटकी, जवस, वाटाणा ही पिके सर्वसाधारण असतील.

तीळ, बाजरी हे पीक भरपूर येईल.

देशाची संरक्षण स्थिती तणावात असेल

राजा कायम असेल...

देशाची आर्थिक स्थिती मजबूत राहणार नाही.

पाऊस जूनमध्ये भरपूर, जुलै सर्वसाधारण, ऑगस्ट, सप्टेंबर कमी असेल...

अनेक भागात महापुरामुळे नुकसान होणार. अंदाज आणि भाकिते कशावरून व्यक्त केली जातात? घटामध्ये रात्रभर होणार्‍या नैसर्गिक बदलाचे पहाटे सूक्ष्म निरीक्षण केले जाते. हजारो शेतकर्‍यांच्या उपस्थितीत पाऊस, हवामान, पीक, अर्थव्यवस्था तसेच देशाचे राजकीय तथा नैसर्गिक संकटाबाबत चाहूल देणारे भाकीत वर्तवण्यात येते. या भविष्यवाणीवर शेतकर्‍यांचा अतुट विश्वास आहे. या भाकिताचा आधार घेऊन ते आपल्या पिकपाण्याचे नियोजन करत असतात. मातीच्या ढेकळावरून चार महिन्यांच्या पावसाचा अंदाज व्यक्त केला जातो. विविध धान्यांवरून आगामी हंगामातील पिके कसे राहतील, हे सांगण्यात येते. चारा-पाणीसाठी सांडाई, कुरडई, तर पुरी निसगार्शी संबंधित राहते. करंजीवरून देशाची आर्थिक परिस्थिती सांगण्यात येते. भादली हे रोगराईचे, तर पान-विडा राजाच्या गादीचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. राजा म्हणजे पंतप्रधान. पान, विड्यात होणार्‍या बदलावरून भविष्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य केले जाते. मसूर हे पीक परकीय घुसखोरीचे द्योतक आहे.शेतकरी यावर विश्वास का ठेवतात आणि शेतकर्‍यांसाठी भाकीत महत्त्वाचे का?

घटमांडणीचे भाकीत ऐकण्यासाठी विदर्भ, खानदेश, मराठवाड्यासह अनेक भागातून शेतकरी भेंडवळमध्ये मुक्कामाला येतात, या परिसरात हजारोंच्या संख्येने शेतकरी एकत्रित जमतात. शेतकरीच नव्हे तर बी-बियाणे कंपन्यांचे प्रतिनिधीही शेतकर्‍यांचा आगामी काळातील कल लक्षात घेण्यासाठी येथे गर्दी करतात. शेतकरी वर्ग घटमांडणीचे भाकीत घेऊन पुढील हंगामाची पेरणी काय करायची, हे ठरवत असतात. पावसाची महिनावार माहिती आणि पीक परिस्थितीचा अंदाजही वर्तवण्यात येत असल्याने निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकर्‍यांसाठी ही घटमांडणी आशेचा किरण बनली आहे.घटमांडणीला शास्त्रीय आधार आहे का?

घटमांडणीला कुठलाही शास्त्रीय आधार नसला तरी आजही परंपरेनं बळीराजाच्या मनातील महत्त्व कमी झालेलं नाही. भेंडवळची प्राचीन घटमांडणी परंपरा विज्ञानाच्या आधुनिक युगातही जपली जात असून, याच भविष्यवाणीविषयी शेतकर्‍यांमध्ये कमालीची उत्सकता पाहायला मिळते. घटमांडणीनंतर वर्तवलेली पाऊस, पीक-पाणी, राजकीय, आर्थिक भाकितं बर्‍याचदा खरी ठरली आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीला निव्वळ ठोकताळे म्हणत असले, तरी शेतकर्‍यांचा भेंडवळ घटमांडणीवर दृढ विश्वास कायम आहे.

Printed, Published and Owned by Abhijeet Narayan Darekar, Printed at Somani Printing Press, kUnit No., Ground Floor, N. K. Industrial Estate, Off Aarey Road, Near Pravasi Ind. Estate, Gate no., Goregaon Mumbai -, Published From At/Post-Palasdari, Tal-Karjat, Dist-Raigad, Maharashtra-, Editor: Abhijeet Narayan Darekar. Mob: 97649 92525

मुद्रक, प्रकाशक आणि मालक अभिजीत नारायण दरेकर यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस युनिट नंबर ४, तळमजला, एन. के. औद्योगिक वसाहत, आरे रोड समोर, प्रवासी इंडस्ट्रियल इस्टेट जवळ, गेट नंबर २, गोरेगाव पूर्व, मुंबई-४०००६३ येथे छापून पळसदरी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र ४१० २०१ येथून प्रकाशित केले. संपादकः अभिजीत नारायण दरेकर. मो. ९७६४९ ९२५२५

# प्राजक्त तनपुरे फडणवीसांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश करण्याची चर्चा, सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'शक्य असेल...'



काही दिवसांपूर्वी राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत शरद पवार गटाचे संभाव्य उमेदवार समजले जाणारे माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे हे भाजपमध्ये प्रवेश करतील, अशी जोरदार चर्चा आहे. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सोमवारी राहुरीत येणार आहेत. या कार्यक्रमात प्राजक्त तनपुरे भाजपचे कमळ हातात घेतील, अशी चर्चा आहे. याविषयी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांना विचारणा करण्यात आली असता त्यांनी आपल्याला तनपुरे यांच्या भाजप प्रवेशाविषयी काही माहिती नसल्याचे सांगितले. त्या सोमवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या.

मी प्राजक्त तनपुरे यांच्याशी अनेकदा बोलली आहे. गेल्याच आठवड्यात आमचं बोलणं झालं होतं, तेव्हा त्यांनी सांगितलं की, ते आता निवडणूक लढू इच्छित नाहीत. त्यांची कार्यकर्त्यांशी चर्चा झाली आणि ते आता लढणार नाहीत, असे त्यांनी सांगितले. पण पुढे आपण एकत्र काम करत राहू, असे ते गेल्याच आठवड्यात मला म्हणाले होते. माझ्या माहितीप्रमाणे प्राजक्त तनपुरे यावेळी विधानसभा लढणार नाहीत. ते कुटुंबासोबत कुठेतरी सुट्टीला जाणार होते, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले. पण प्राजक्त तनपुरे आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश करतील, अशी चर्चा आहे, असा प्रश्न सुप्रिया सुळे यांना विचारण्यात आला. त्यावर सुप्रिया सुळे यांनी म्हटले की, शक्य असेल. पण ते मला तसं काही बोललेले नाहीत. मी त्यांच्यासोबत अनेक वर्षे काम केले आहे, अशी टिप्पणी सुप्रिया सुळे यांनी केली.तत्त्वांशी एकनिष्ठ राहणाऱ्यांचं राजकारण संपतंयः प्राजक्त तनपुरे

माझ्यासोबत पक्षात असणारे तिघेजण राष्ट्रवादी अजित पवार पक्षात गेले , तिकडे त्यांना कॅबिनेट मंत्री पद मिळाले. मात्र, दुसरीकडे आमच्यासारखे निष्ठा ठेवणाऱ्या राजकारण्यांचे राजकारण संपत चालले आहे याचे दुःख होते, अशी भावना प्राजक्त तनपुरे यांनी बोलून दाखवली. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवावी असा प्रस्ताव आला होता. पण मला निष्ठा, तत्व याच्याशी प्रामाणिक राहावं असे वाटले. पण सध्याचे राजकारण म्हणजे जो तत्वाशी जोडला राहिल त्याचे राजकारण संपत आहे, याउलट जे तत्त्वांशी तडजोड करतात ते सत्तेत मोठ्या पदावरती जातात अशी स्थिती आहे, अशी खंत प्राजक्त तनपुरे यांनी अलीकडेच बोलून दाखवली होती. त्यांच्या 'या' वक्तव्यानंतर प्राजक्त तनपुरे भाजपमध्ये जाण्याच्या पर्यायाचा गांभीयार्ने विचार करत आहेत अथवा त्यांनी त्यांचा निर्णय घेतला आहे, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे.

# कल्याण टिटवाळ्यातील हायप्रोफाईल सोसायटीत मुंबई पोलिसांची धाड; 6 कोटींच्या अमली पदार्थांच्या 5 हजार गोळ्या जप्त, महिलेला अटक



मुंबईतील नेस्को ड्रग्ज पार्टी प्रकरणानंतर पोलिसांनी अमली पदार्थ विरोधी मोहिमेचा वेग वाढवला आहे. या मोहिमेअंतर्गत पोलिसांनी साकिनाका आणि टिटवाळा परिसरात मोठी कारवाई करत सुमारे 6 कोटी रुपये किमतीच्या 5 हजार एक्स्टसी गोळ्या जप्त केल्या आहेत. मुंबई साकीनाका पोलिसांनी पॉल नावाच्या महिलेला तिच्या टिटवाळ्यातील घरातून अटक केलीय. तिच्या घराची झडती घेतली असता 6 कोटींचे ड्रग्ज सापडले आहे. नेस्को ड्रग्ज पार्टी प्रकरणानंतर पोलिसांनी तपास सुरू केला होता. पोलिसांनी आधी साकीनाका येथून 200 गोळ्यांसह इरफान अन्सारीला पकडले, त्यानंतर सुफियानला अटक केली आणि त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरून या महिलेपर्यंत पोलीस पोहोचले. जप्त केलेल्या गोळ्यांवर मर्सिडीज, डॉलर यांसारखी विविध चिन्हे

दरम्यान, ही महिला पूर्वी डान्स बारमध्ये काम करायची. तिने दोन लग्ने केली असून तिचा पतीदेखील गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्याचे समजते. ती दोन महिन्यांपूर्वीच कल्याण सोडून टिटवाळ्यात राहण्यासाठी गेली होती. पोलिसांनी तपासात तिच्या घरातून 4 ते 5 मोबाईल फोन आणि 8 सिमकार्ड जप्त केली आहेत. ड्रग्जच्या जप्त केलेल्या गोळ्यांवर मर्सिडीज, डॉलर यांसारखी विविध चिन्हे आणि अक्षरे कोरलेली आहेत. या चिन्हांचा नेमका अर्थ काय? यात अजून कोण कोण सहभागी आहे? याचा अधिक तपास पोलीस करत आहे. सिनेस्टाइल कारवाई, पुण्यात ड्रग्जचे धागेदोर हाती लागण्याची शक्यता

दुसरीकडे, मुंबई ड्रग्जचे रॅकेट थेट कल्याण-टिटवाळामध्ये येऊन पोहोचल्याने मोठी खळबळ उडाली आहे. मुळची पुण्याची रहिवाशी असलेली अश्विनी फ्रान्सिस पॉल ही नवी मुंबईत राहत होती. ती लग्नाच्या पतीसोबत राहत नसून ती तिच्या बॉयफ्रेंड सोबत राहत होती. तिचा बॉयफ्रेंड सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे. कल्याण टिटवाळामधील पद्मावती रॉयल्समध्ये इमारत नंबर दोनमध्ये रूम नंबर 705 मध्ये राहत होती. मुंबई पोलिसांनी आणि कल्याण टिटवाळा ग्रामीण पोलिसांनी मिळून ही कारवाई केली. पोलिसांनी कारवाई दरम्यान कमालीची गुप्तता पाळली होती. इमारतीच्या परिसरात असलेले सीसीटीव्ही पोलिसांनी बंद करून ही कारवाई केली. जेणेकरून कारवाईची चर्चा कुठे होणार नाही, याची काळजी घेतली. अश्विनी आणखी कोणाच्या संपर्कात आहे का? ती मुळची पुण्याची रहिवासी असल्याने पुण्यात ड्रग्जचे धागेदोर हाती लागतात का? याचा शोध पोलीस घेत आहेत.

# एनजीओमध्ये काम करणाऱ्या सहकारी हिंदू तरुणींवर इस्लाम धर्मातील परंपरा पाळण्यासाठी दबाव; NGO प्रमुखाला अटक




नाशिक येथील नामांकित आयटी कंपनीतील कर्मचारी धर्मांतर आणि लैंगिक छळ प्रकरणानं संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. अशातच या प्रकरणाच्या तपासात रोज नवे खुलासे होत आहे. असे असताना उपराजधानी नागपुरात देखील असाच काहीसा प्रकार उघडकीस आला आहे. नागपुरातील युनिव्हर्सल मल्टीपर्पज सोसायटी' या नामांकित एनजीओमध्ये काम करणाऱ्या हिंदू तरुणींवर इस्लाममध्ये पाळले जाणारे काही धार्मिक नियम आणि परंपरा पाळण्यासंदर्भात दबाव आणले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरातील मानकापूर पोलीस स्टेशनमध्ये यासंदर्भात झालेल्या तक्रारीतून हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एनजीओचे संचालक 'रियाज काजी' तिथे काम करणाऱ्या 23 ते 26 वर्ष वयोगटातील काही तरुणींवर तुम्ही नमाज पठण केले पाहिजे, रोजे ठेवले पाहिजे, दुवा मागितली पाहिजे, एकमेकांना अभिवादन करताना खुदा हाफिज बोलले पाहिजे, असं दबाव आणत असल्याचा आरोप तिथे काम करणाऱ्या तरुणींनी केला आहे.

मात्र, एनजीओचा प्रमुख असून ही तरुणींनी आपल्या धार्मिक विश्वासाच्या विरोधात जाऊन परधमार्तील परंपरा पाळण्यास नकार दिल्यानंतरही वारंवार रियाज काजी सातत्याने त्या धार्मिक नियमांच्या बद्दल आग्रह धरायचा, असा तक्रारकर्त्या तरुणींचा आरोप आहे...एवढेच नाही तर, चार पैकी एका तरुणीने रियाज काझीने तिच्यासोबत अश्लील वागणूक केल्याचे आरोप ही केले आहे. पोलिसांनी या प्रकरणी रियाज काजी (48 वर्ष) या एनजीओ प्रमुखाला अटक केली असून याप्रकरणी त्याला साथ देणारे आणखी कोणी आहेत का? या संपूर्ण दबाव आणण्याच्या तंत्रामागे धर्म परिवर्तन घडवून आणण्याचा हेतू होता का? या एनजीओमध्ये यापूर्वी काम करणाऱ्या मात्र नोकरी सोडून देणाऱ्या आणखी काही महिला आहेत का? आणि त्यांनी नोकरी का सोडली? या एनजीओला फंडिंग कुठून मिळते? याचाही तपास पोलिसांनी सुरू केला आहे.दरम्यान, पोलिसांच्या अटकेच्या कारवाईनंतर नागपूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने रियाज काजीला 23 एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# 'मी आत्मज्ञानी.. मंत्र तंत्राचा बाप, माझ्याकडे दैवीशक्ती' अटकेनंतर भोंदू गडगे महाराज नको नको ते बरळला



मंत्रोच्चार आणि दैवी शक्तीच्या नावाखाली दुर्धर आजार बरे करण्याचा खोटा दावा करून सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्या भोंदू राजेंद्र गडगे याच्या मुसक्या आवळण्यात संगमनेर पोलिसांना यश आले आहे. सोबतच भोंदू राजेंद्र गडगेचा दरबार देखील पोलिसांकडून सिल करण्यात आला. संगमनेर पोलीसांनी गडगेच्या आश्रमाची चार तास झाडाझडती घेत वडगावपान येथील दत्तधाम दरबारात स्पॉट पंचनामा देखील केला. यावेळी तपासाचा भाग म्हणून राजेंद्र गडगे याला दत्तधाम दरबारात नेले असता त्याने पोलिसांसमोर छातीठोकपणे अंनिसला थेट आव्हान करीत मला अडकविण्याचा कट असल्याचे म्हटले. 'मी लोकांची सेवा करतो, माझ्याकडे दैवी शक्ती आहे. मी मंत्र-तंत्राचा बाप आहे. कारण मी आत्मज्ञानी आहे, अशा शब्दांत भोंदूगिरीचा आरोप असलेला राजेंद्र गडगे याने पोलिसांसमोर छातीठोकपणे आपला म्हणणं मांडलंय. विशेष म्हणजे पोलिसांनी बोलण्यास थांबवल्यानंतरही 'पोलीस माझा छळ करताय' असे आरोपही त्याने यावेळी केली.संगमनेर पोलीसांनी गडगेच्या आश्रमाची चार तास झाडाझडती घेत वडगावपान येथील दत्तधाम दरबारात स्पॉट पंचनामा केला. यावेळी पोलीसांनी गडगेच्या आश्रमाची चार तास झाडाझडती घेतली. भोंदू गडगेला पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. परिणामी दाखल गुन्ह्यासंदर्भात पोलीसांकडून तपास सुरू आहे. या चौकशीचा भाग म्हणून दरबारातील विविध औषधांचे नमुनेही ताब्यात घेतले आहेत. सध्या भोंदू राजेंद्र गडगेची कसून पोलीस चौकशी सुरु आहे. वडगावपान येथे 'दत्तधाम सरकार' नावाने दरबार भरवून फसवणूक करणाऱ्या या भोंदूविरुद्ध अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तक्रारीनंतर ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.भोंदू राजेंद्र गडगेचा माध्यमांवर संताप...

'माझ्यात दैवीशक्ती, मी आत्मज्ञानी, भोंदू राजेंद्र गडगेचा दावा'

सर्व आजाराचे लोक असतात. येथे फक्त ध्यानसाधना चालते, वैदिक प्रकिया चालते. सनातन धर्मांच खंडन होतय. जे असत ते लाईव असतं मी मंत्र तंत्र वापरत नाही, मी आत्मज्ञानी आहे. माझ्याकडे दैवीशक्ती आहे. असा दावा भोंदू गडगेने कला आहे.राजेंद्र बापू गडगे याने वडगावपान परिसरात स्वतःला दैवी शक्ती प्राप्त असल्याचे भासवून 'दत्तधाम सरकार' नावाचे यूट्यूब चॅनल सुरू केले होते. या माध्यमातून तो कर्करोगासारखे गंभीर आजार मंत्रशक्तीने बरे करणे, मूल नसलेल्या महिलांना मूल प्राप्त करून देतो तसेच घरातील विविध समस्या दूर करण्याचे खोटे दावे करत असे. या आमिषाला बळी पडून अनेक नागरिक त्याच्या दरबारात हजेरी लावत होते.

# ऑनलाईन गेमिंगमध्ये लावलेले सगळे पैसे हरला, कोल्हापुरात तरुणाने नैराश्याच्या भरात आयुष्य संपवलं



कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील कोरोची येथील आदित्य मिलिंद कोळी या अवघ्या 24 वर्षीय तरुणाने ऑनलाईन गेमिंगच्या नादात पैसे हरल्यानंतर नैराश्यामध्ये राहत्या घरी गळ्याला दोरी लावत आयुष्याचा शेवट केला. हा धक्कादायक प्रकार शनिवारी (18 एप्रिल) सायंकाळी उघडकीस आला. कोरोची बस स्थानकामागील आपल्या राहत्या घरी आदित्यने टोकाचे पाऊल उचलले. शनिवारी सायंकाळी पावणे पाचच्या सुमारास आदित्यने वरच्या खोलीमध्ये लोखंडी अँगलला गळ्याला दोरी लावत आयुष्याचा शेवट केला. घरातील मंडळी कामावर गेल्यानंतर हे टोकाचे पाऊल उचललं. ऑनलाईन गेमिंगच्या नादात पैसे हरला. दरम्यान, आदित्यने आयुष्याचा शेवट करण्यापूर्वी चिठ्ठी लिहून ठेवली होती. या चिट्ठीमध्ये ऑनलाईन गेमिंगला बळी पडल्याचं त्याने म्हटलं आहे. या नादात पैसे गमावल्याने हे पाऊल उचलल्याचे नमूद केलं आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्याच्या वडिलांचे एक वर्षांपूर्वीच निधन झालं आहे. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्याच्यावरतीच होती. दरम्यान, त्याचा चुलत भाऊ भालचंद्र संजय कोळी यांनी शहापूर पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे.

# खालापूरची ग्रामदेवता आई श्री. साबाई माता गडावर जाणे-येणेकरिता रस्ता मिळण्यासाठी

## खालापूर तहसीलदार व नगराध्यक्षा खालापूर नगरपंचायत यांना खालापूर ग्रामस्थांकडून निवेदन देण्यात आले.






खालापूरः दिपक जगताप

खालापूर गावची ग्रामदेवता आमचे ग्रामस्थांचे श्रध्दास्थान आई श्री. साबाईमातेचे मुळस्थान हे मुंबई-पुणे हायवे लागत ढापणी गडावर असुन अनेक वर्षानूवर्षे आंम्ही ग्रामस्थ भाविक भक्त दर्शनासाठी ढापणी गडावर ये-जा करीत असतात. कित्येक वर्षापासुन खालापूर गावातून भाविक मुंबई-पुणे हायवे ओलांडून हायवे पलीकडील पायवाटेवरून ढापणी गडावर आई श्री. साबाई मातेच्या दर्शनासाठी जात आहेत. गेल्या अनेक वर्षापासुन भाविकांसाठी पायवाट होती. परंतु आता व्यावसायिकांनी तिथे असलेल्या जागेत संरक्षण भिंत बांधल्याने तो रस्ता बंद झाला असुन भाविकांना गडावर जाण्यास त्रास होत आहे. आंम्हा भविकांना ग्रामदेवता आई श्री. साबाई मातेच्या दर्शनासाठी जाणेसाठी आपल्या मार्गदर्शनातुन अथवा व्यवसायिकांना योग्य तो आदेश देऊन आंम्हाला रस्त्याचा मार्ग खुला करून दयावा असे निवेदन आज खालापूर ग्रामस्थ यांचे वतीने तहसीलदार अभय चव्हाण व खालापूर नगर पंचायतच्या नगराध्यक्षा रोशना मोडवे व उपनगराध्यक्ष किशोर पवार यांना देण्यात आले. यावेळी ग्रामस्थ नवीनदादा घाटवळ, उमेश गावंड, मंगेश चौधरी,मिलिंद पाटील, कवडे काका,दीपक पाटील, उमेश पडवकर, मंगेश चाळके, महेश भगत, बबन चव्हाण, दिपक लोते, दिपक जगताप आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

# मदत करतो बोलून गाडीवर बसवले; निर्जनस्थळी नेऊन महिलेवर अत्याचार



महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. एका 65 वर्षीय महिलेवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. सदर घटनेनंतर सीसीटीव्हीच्या आधाराने पोलिसांनी अटक केली आहे. महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील म.प्र.येथील एका गावातून परतवाडा येथे उपचाराकरीता पायी जात असलेल्या 65 वर्षीय वृद्ध महिलेला अज्ञात आरोपीने, मी पण परतवाडा येथे जात आहे चला मी तुम्हांला माझ्या गाडीवर सोडतो असे म्हणून पीडित महिलेस स्वतःच्या दुचाकीवर बसवले आणि परतवाडाकडे निघाला. रस्त्यातच खरपी शिवारात रस्त्याच्या डावीकडे जाणाऱ्या पांदन रस्त्यावर निर्जन आणि एकांत ठिकाणी आरोपीने वृद्ध महिलेस मला इकडे एक काम आहे, चला आपण तिकडे जाऊ, माझे काम करून पूढे परतवाड्याला जाऊ, असे म्हणून महिलेस गाडीखाली उतरवून तिला पांदन रस्त्याकडे नेले आणि तिथे कोणीही नसल्याचा फायदा घेत वृद्ध महिलेशी बळजबरीने वारंवार संभोग केला आणि महिलेकडील तिच्या उपचाराकरीता असलेले 600 रुपये बळजबरीने काढून घेतले.सदर घटनेदरम्यान गुन्ह्यातील पीडित महिलेला गंभीर दुखापत आरोपीने केली. आरोपीने पीडित महिलेस स्वतःचे दुचाकीवर ज्या मागार्ने नेले, त्या मार्गावरील सर्व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी शिरजगाव कसबा पोलीसांनी केली आणि त्याला आज अटक केली असून आरोपीचे नाव आवेज खान युनुस खान, राहणार परतवाडा असे असल्याचे निष्पन्न झाले.भंडारा जिल्ह्यातून एक अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. आपल्या मुलीच्या अल्पवयीन मैत्रिणीवरचं एका नराधमान अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार भंडाऱ्याच्या मोहदुरा गावात घडला आहे. या घटनेनंतर पीडित मुलीनं विषप्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला असून, सध्या तिच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आरोपीची मुलगी आणि पीडिता या दोघीही एकाच वर्गात शिकतात. पीडिता तिच्या मैत्रिणीच्या म्हणजेच आरोपीच्या घरी थांबली असताना, आरोपीनं तिला दुचाकीवर फिरवून आणण्याच्या बहाण्यानं बाहेर नेत एका निर्जनस्थळी नेऊन अत्याचार केला. शुक्रवारी सकाळी पीडितेनं घडलेला प्रकार आपल्या कुटुंबीयांना सांगितल्यानंतर गावात एकच खळबळ उडाली. या घटनेच्या धक्क्यातून आणि मानसिक त्रासातून पीडितेनं विषप्राशन करून आपले जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. तिला तातडीनं जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच भंडारा पोलिसांनी आरोपी सोमा मेश्राम याला अटक केली आहे.

# लोक जगू देणार नाहीत... विवाहित प्रियकराने विवाहित प्रेयसीला कालव्यात ढकललं

अंबड नालेवाडी येथे बाबासाहेब राठोडने प्रेयसी सुरेखाला कालव्यात ढकलून मारलं, आत्महत्येचा बनाव फसला, पोलिसांनी त्याला अटक करून तीन दिवसांची कोठडी दिली.दोघांचंही लग्न झालेलं, पण कामाच्या ठिकाणी ओळख झाली, मैत्रीही घट्ट जमली आणि कधी प्रेम बहरत गेलं समजलंच नाही. एकमेकांच्या प्रेमात अखंड बुडाले, मग मात्र घोटाळा झाला. महिलेला नवऱ्याला सोडून प्रियकराकडे यायची ओढ लागली. प्रियकराला मात्र बायकोलाही सोडायचं नव्हतं आणि प्रेमालाही. तो कात्रीत फसल्यासारखं झालं. दोघांनी हिम्मत करून पळून जाण्याचा निर्णय घेतला. दोघंही ठरल्या प्रमाणे भेटले. पण प्रियकर म्हणाला आपण पळून जाऊनही आपल्याला कुणीही स्वीकारणार नाही. त्यापेक्षा आपण दोघंही एकत्र जाऊया. कायमचं जाऊ, कुणाला आपला त्रास नाही, आपण एकमेकांशिवाय राहू शकत नाही. शेवटचं एकमेकांना डोळे भरून पाहिलं, आणाभाका घेतला आणि दोघांनीही कालव्यात एकत्र उडी मारून आयुष्याचा शेवट केला. मात्र इथे सगळं सपलं असं वाटलं तरी खरा ट्विस्ट इथेच आहे. कालव्यात उडी घेतल्यानंतर पुढच्या काही मिनिटांत प्रियकर हळूच पाण्यातून बाहेर आला. महिलेचा मात्र बुडून मृत्यू झाला. लोक आपल्याला जगू देणार नाहीत, चल एकत्र आयुष्य संपवूया! म्हणणाऱ्या प्रियकराने धोका दिला होता. प्रियकराने आयुष्य संपवण्याचा खोटा बनाव रचला आणि प्रियसीलाच संपवलं. प्रियकराने आपल्या प्रेयसीला मृत्यूच्या दारात ढकलल्याची खळबळजनक घटना अंबड तालुक्यातील नालेवाडी शिवारात घडली. याप्रकरणी गोंदी पोलिसांनी आरोपी प्रियकराला मध्यरात्री बेड्या ठोकल्या आहेत.मैत्री, प्रेम अन् संसाराचा हट्ट बाबासाहेब छगन राठोड आणि सुरेखा आन्वीकर यांची ओळख १० वर्षांपूर्वी एका कामाच्या ठिकाणी झाली होती. ओळखीचं रूपांतर पुढे प्रेमात झालं. सुरेखा विवाहित होती, पण पतीसोबत वाद झाल्याने ती घर सोडून बाबासाहेबसोबत राहण्यासाठी आली

# 'आयपीएलच्या 2023 च्या मोसमात मला अफगाणिस्तान सोडून...' राशिद खानचा सनसनाटी खुलासा!



अफगाणिस्तानचा स्टार गोलंदाज रशीद खानने मोठा खुलासा केला आहे. त्याने सांगितले की, त्याला भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही देशांचे नागरिकत्व आणि खेळण्याचा प्रस्ताव मिळाला होता, परंतु त्याने त्या नाकारल्या आणि अफगाणिस्तानशी आपली निष्ठा कायम ठेवली. 27 वर्षीय स्टार लेग-स्पिनरने त्याच्या आगामी 'रशीद खानः फ्रॉम स्ट्रीट्स टू स्टारडम' या पुस्तकात खुलासा केला आहे की, 2023 च्या आयपीएल हंगामादरम्यान त्याला इतर देशांसाठी खेळण्याचा अनौपचारिक पर्याय देण्यात आला होता. रशीदने लिहिले आहे, मला ऑस्ट्रेलिया आणि भारत या दोन्ही देशांकडून अशा ऑफर्स आल्या होत्या. पण मी स्पष्टपणे सांगितले की, जर मी माझ्या देशासाठी खेळणार नाही, तर मी इतर कोणत्याही देशासाठी खेळणार नाही. 'भारतात या, आम्ही तुम्हाला भारतीय कागदपत्रे देऊ' भारताच्या ऑफरचा संदर्भ देत रशीदने स्पष्ट केले की, तो गुजरात टायटन्सकडून खेळत असताना संघाच्या एका अधिकाऱ्याने त्याला भारतीय क्रिकेट बोर्डाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याला भेटायला सांगितले. रशीद म्हणाला, मी त्यांना भेटलो. ते म्हणाले, 'तुमच्या देशातील परिस्थिती खूप वाईट आहे. भारतात या, आम्ही तुम्हाला भारतीय कागदपत्रे देऊ, येथेच राहा आणि क्रिकेट खेळा. हे ऐकून मला आश्चर्य वाटले. मी हसून म्हणालो, 'खूप खूप धन्यवाद, पण मी माझ्या देशासाठी, अफगाणिस्तानसाठी खेळत आहे. रशीदच्या बाबतीत घडलेली ही पहिली घटना नाही. 2018 मध्ये, सनरायझर्स हैदराबादकडून खेळताना, कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या त्याच्या अष्टपैलू कामगिरीमुळे (10 चेंडूंमध्ये 34 धावा आणि 3 बळी) सोशल मीडियावर त्याला भारतीय नागरिकत्व देण्याची मागणी जोर धरू लागली होती. त्यावेळी, अनेक वापरकर्त्यांनी तत्कालीन परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांना टॅग केले होते. त्यावर त्यांनी उत्तर दिले, नागरिकत्वाशी संबंधित निर्णय गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत येतात. अफगाणिस्तानचे तत्कालीन राष्ट्रपती अश्रफ घनी यांनीही या मुद्द्यावर ठाम भूमिका घेतली होती. रशीदला देशाचा अभिमान संबोधून, अफगाणिस्तान आपल्या स्टार खेळाडूला सोडून देणार नाही, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. नंतर रशीदने या समर्थनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि अफगाणिस्तानप्रती आपली वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली.

# IPL मध्ये काळीजादू...लिंबू घेऊन तंत्रमंत्र, CSK ची बीसीसीआयकडे तक्रार



आयपीएल 2026 मधील सनरायझर्स हैदराबाद आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यातील एका रोमांचक सामन्यादरम्यान, अशी एक घटना घडली ज्यामुळे संपूर्ण क्रिकेट जगताला धक्का बसला. सनरायझर्स हैदराबादच्या एका चाहत्याने सामना सुरु असताना मैदानात लिंबू घेऊन तंत्रमंत्र केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यानंतर चेन्नई सुपर किंग्सने हे प्रकरण गांभीयार्ने घेतले आणि बीसीसीआयकडे अधिकृत तक्रार दाखल केली.

चेन्नईविरुद्धच्या सामन्यादरम्यान, मैदानात बसलेल्या सनरायझर्स हैदराबादच्या एका चाहत्याने सीएसकेची विकेट जाण्यासाठी लिंबावर एक विधी केला. व्हायरल व्हिडीओमध्ये स्पष्टपणे दिसते की, तो चाहता लिंबूसोबत मंत्रोच्चार आणि विधी करत होता आणि पुढच्याच चेंडूवर सीएसकेचा फलंदाज बाद झाला. विकेट पडताच चाहत्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. आता सदर व्हिडीओवरुन चेन्नईने बीसीसीआयकडे पत्र लिहून तक्रार केली आहे. चेन्नई सुपर किंग्सचे सीईओ कासी विश्वनाथन यांच्या स्वाक्षरीचे, 19 एप्रिल 2026 रोजीचे एक अधिकृत पत्र बीसीसीआयला पाठवण्यात आले. प्रेक्षकांच्या अयोग्य वर्तनाबाबत तक्रार , असं या तक्रारीच्या पत्राचे शीर्षक आहे.

चेन्नई फ्रँचायझीने स्पष्टपणे आरोप केला आहे की, आयपीएल 2026 सामन्यादरम्यान स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या काही प्रेक्षकांनी काळीजादू आणि अलौकिक आणि हानिकारक प्रथांचा अवलंब केला. या विधींचा चेन्नईच्या खेळाडूंच्या मानसिक आणि शारीरिक स्थितीवर थेट परिणाम झाला, ज्यामुळे त्यांची कामगिरी अत्यंत खराब झाली. बीसीसीआयने या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि भविष्यात असा प्रकार प्रतिबंध करण्यासाठी कठोर मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत, अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे. 'भूत आणि जादूटोणा' या तक्रारीवर बीसीसीआय काय भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. सनरायझर्स हैदराबादने चेन्नई सुपर किंग्स यांच्यात 18 एप्रिल रोजी हैदराबादमध्ये सामना खेळवण्यात आला. या सामन्यात हैदराबादने चेन्नईचा 12 धावांनी पराभव केला होता. या सामन्यात, प्रथम फलंदाजी करताना हैदराबाद संघाने 194 धावांची धावसंख्या उभारली. एका टप्प्यावर, चेन्नईचा संघ सहज विजयाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे वाटत होते. कारण चेन्नईला शेवटच्या 10 षटकांत विजयासाठी केवळ 84 धावांची आवश्यकता होती. मात्र, मधल्या षटकांमध्ये ईशान मलिंगाने चेन्नईला धक्का देत दोन विकेट्स पटकावले. शिवम दुबे हा चेन्नईचा शेवटचा आशेचा किरण ठरला होता, परंतु साकिब हुसेन आणि नितीश कुमार रेड्डी यांच्या भेदक गोलंदाजीसमोर संपूर्ण चेन्नईचा संघ पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळला.

# सचिन, सेहवाग, धोनीसोबत टीम इंडियाकडून टी-20 खेळला, तरीही आयपीएलमधून बाहेर!



इंडियन प्रीमियर लीगच्या (क्ढछ2026) 19 व्या हंगामाचा उत्साह हळूहळू शिगेला पोहोचत आहे. आयपीएल ही जगातील सर्वात मोठी आणि सर्वात रोमांचक टी20 लीग आहे. 2008 मध्ये सुरू झालेल्या या लीगने क्रिकेट विश्वात क्रांती घडवून आणली. महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली 2007 चा टी20 विश्वचषक जिंकल्यानंतर, भारतात या फॉरमॅटची लोकप्रियता शिगेला पोहोचली आणि आयपीएलनेच तिला नव्या उंचीवर नेले. भारताने आपला पहिला टी20 आंतरराष्ट्रीय सामना 2006 मध्ये वीरेंद्र सेहवागच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला. तेव्हापासून, 119 खेळाडूंनी या फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. आयपीएलमध्ये खेळलेल्या भारतीय आणि परदेशी खेळाडूंची एकूण संख्या 1,000 पेक्षा जास्त आहे.सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांसारख्या दिग्गजांनी भारतासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर टी20 क्रिकेट खेळले आणि आयपीएलमध्येही भाग घेतला आहे. दुसरीकडे, सौरभ गांगुली, व्हीव्हीएस लक्ष्मण आणि अनिल कुंबळे यांसारख्या दिग्गजांनी भारतासाठी टी-20 आंतरराष्ट्रीय सामने खेळले नाहीत, पण नंतर ते आयपीएलमध्ये सहभागी झाले. पण सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, एक असा खेळाडू होता जो भारतासाठी टी-20 क्रिकेट खेळला, पण त्याला आयपीएलमध्ये खेळण्याची संधी कधीच मिळाली नाही. या खेळाडूचे नाव आहे दिनेश मोंगिया.पहिल्या टी-20 आंतरराष्ट्रीय विजयाचा नायक मोंगिया .दिनेश मोंगिया भारताचा पहिला टी-20 आंतरराष्ट्रीय सामना खेळला, जो 1 डिसेंबर 2006 रोजी जोहान्सबर्गमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला गेला होता. त्या सामन्यात त्याने 45 चेंडूंमध्ये 38 धावा करून संघासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भारताने तो सामना 1 चेंडू शिल्लक असताना 6 गडी राखून जिंकला. असे असूनही, जेव्हा आयपीएल सुरू झाली आणि नंतर जगातील सर्वात मोठी टी-20 स्पर्धा बनली, तेव्हा मोंगियाला या लीगमध्ये संधी मिळाली नाही.

# 3 कॅच सोडल्या, रिकी पॉन्टिंग संतापला; श्रेयस अय्यर शशांक सिंहला तोंड लपवून घेऊन गेला



आयपीएल 2026 च्या हंगामात काल पंजाब किंग्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना खेळवण्यात आला. या सामन्यात पंजाब किंग्सने 54 धावांनी विजय मिळवला. या विजयासह पंजाबने गुणतालिकेतील आपले अव्वल स्थान अधिक भक्कम केले. लखनौला सलग तिसऱ्या पराभवास सामोरे जावे लागले. 20 षटकांत 7 बाद 254 धावा उभारल्यानंतर पंजाबने लखनौला 20 षटकांत 5 बाद 200 धावांवर रोखले. पंजाब आणि लखनौच्या सामन्यानंतर सोशल मीडियावर पंबाजचा कर्णधार श्रेयस अय्यर आणि पंजबाचा फलंदाज शशांक सिंहची चर्चा सुरु आहे. शशांक सिंहने सामन्यात तीन महत्वाचे झेल सोडले. त्यामुळे मुख्य प्रशिक्षक रिकी पॉन्टींगसह पंजाबचे गोलंदाज चांगलेच चिडल्याचे पाहायला मिळाले. मात्र श्रेयस अय्यरची वेगळची रिॲक्शन पाहायला मिळाली. शशांक सिंह वारंवार झेल सोडत असताना श्रेयस अय्यर हसताना दिसून आला. तसेच सामना संपल्यानंतर श्रेयस अय्यर शशांक सिंहकडे गेला आणि खांद्यावर हात टाकून टोपीने त्याच्या चेहरा लपवण्याचा प्रयत्न केला. श्रेयस अय्यर आणि शशांक सिंहच्या या कृतीमुळे सगळ्यांना हसू अनावर झाले. यादरम्यानचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या पंजाब किंग्सची सुरुवात खराब झाली. प्रभसिमरन सिंग एकही धाव न काढता मोहम्मद शमीच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर कूपर कॉनोली आणि प्रियांश आयार्ने धमाकेदावर फलंदाजी केली. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी 80 चेंडूंमध्ये 182 धावांची भागीदारी रचली. प्रियांशने 37 चेंडूंमध्ये चार चौकार आणि नऊ षटकारांसह 93 धावांची दमदार खेळी केली. दरम्यान, कॉनोलीने 189 च्या स्ट्राईक रेटने 46 चेंडूंमध्ये आठ चौकार आणि सात षटकारांसह 87 धावांची उत्कृष्ट खेळी केली. कर्णधार श्रेयस अय्यर फलंदाजीत फारसा प्रभाव पाडू शकला नाही. मार्कस स्टोइनिस आणि शशांक यांनी अवघ्या 17 चेंडूंमध्ये सहाव्या विकेटसाठी 44 धावांची भागीदारी केली. शशांक 6 चेंडूंमध्ये 17 धावा करत बाद झाला, तर स्टोइनिसने 16 चेंडूंमध्ये 29 धावा केल्या. लखनौकडून प्रिन्स यादवने 25 धावांत 2 बळी घेतले, तर एम सिद्धार्थने 35 धावांत 2 विकेट्स पटकावल्या.लक्ष्याचा पाठलाग करताना, लखनौ सुपर जायंट्सने शानदार सुरुवात केली. आयुष बडोनी आणि मिचेल मार्श यांनी 6 षटकांत पहिल्या विकेटसाठी 61 धावा जोडल्या. मार्श 28 चेंडूंत 40 धावा करून बाद झाला. बडोनीने 21 चेंडूंत 35 धावा केल्या. कर्णधार ऋषभ पंत चांगल्या फॉर्ममध्ये दिसत होता. परंतु त्याला मोठी खेळी करता आली नाही. पंत अवघ्या 23 चेंडूंत 43 धावांची दमदार खेळी केली. पंतने आपल्या खेळीत एक चौकार आणि चार षटकार मारले.या सामन्यात निकोलस पूरनचा खराब फॉर्म कायम राहिला आणि तो 9 धावांवर बाद झाला. एडन मार्करम आणि मुकुल चौधरी यांनी पाचव्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली. त्यांनी मिळून 33 चेंडूंत 60 धावा जोडल्या, पण ते संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. मार्करामने 22 चेंडूंमध्ये 42 धावा केल्या, तर मुकुल 17 चेंडूंमध्ये 21 धावांवर नाबाद राहिला. पंजाबकडून मार्को जॅनसेनने 37 धावांत 2, तर अर्शदीप सिंग, विजयकुमार वैशाख आणि चहल यांनी प्रत्येकी एक विकेट पटकावली.

# श्रेयससमोर ऋषभ पंतची शरणागती, पंजाबचा विजयरथ सुसाट, तर लखनऊच्या पराभवाची हॅट्रिक



आयपीएल 2026 मध्ये पंजाब किंग्सचा विजयरथ रोखणे सध्या तरी कोणत्याही संघाला शक्य होताना दिसत नाहीये. रविवारी झालेल्या 28 व्या सामन्यात पंजाब किंग्सने ऋषभ पंतच्या लखनऊ सुपर जायंट्सचा 54 धावांनी दणदणीत पराभव केला. या विजयासह श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाबने सलग पाचवा विजय नोंदवून गुणतालिकेत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे, त्याने प्लेऑफच्या दिशेने दमदार पाऊल टाकले. तर लखनऊला सलग तिसऱ्या पराभवाचा धक्का बसला आहे. प्रियांश-कूपरची फटकेबाजी आणि धावांचा डोंगर.प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या पंजाब किंग्सची सुरुवात वादळी झाली. प्रियांश आर्य आणि कूपर कॉनोली या जोडीने लखनऊच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच हल्ला चढवला. या दोघांनी मैदानावर जणू काही धावांचे तांडवच घातला. दोघांनी मिळून अवघ्या 80 चेंडूंमध्ये 182 धावांची भागीदारी केली.प्रियांश आणि कॉनोली यांनी मिळून अवघ्या 83 चेंडूंमध्ये 180 धावा केल्या. दोघांनी मिळून 16 षटकार आणि 12 चौकार मारले. त्यांच्या धमाकेदार अर्धशतकी खेळींच्या जोरावर पंजाबने निर्धारित 20 षटकांत 7 गडी गमावून 254 धावांचा डोंगर उभा केला. या हंगामातील पंजाबची ही सर्वोच्च धावसंख्या ठरली असून, लखनऊच्या गोलंदाजीचे वाभाडे काढण्यात पंजाबचे फलंदाज यशस्वी झाले.

ऋषभ पंत अन् मिचेल मार्श एकटे पडले...

255 धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊ सुपर जायंट्सची सुरुवात अत्यंत अडखळत झाली. सुरुवातीचे फलंदाज स्वस्तात बाद झाल्यानंतर कर्णधार ऋषभ पंतने 43 धावा करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला, तर मिचेल मार्शने 40 धावांची खेळी केली. मात्र, धावगती वाढवण्याच्या नादात लखनऊने ठराविक अंतराने विकेट्स गमावल्या. 20 ओव्हर्सअखेर लखनऊला 5 गडी गमावून केवळ 200 धावांपर्यंतच मजल मारता आली.पंजाबच्या विजयात गोलंदाजांनीही मोलाची भूमिका बजावली. मार्को जॅनसेनने घातक मारा करत लखनऊचे 2 महत्त्वाचे बळी घेतले. त्याला अर्शदीप सिंग, अनुभवी युझवेंद्र चहल आणि विजयकुमार वैशाख यांनी प्रत्येकी 1 बळी घेत उत्तम साथ दिली. पंजाबच्या शिस्तबद्ध माऱ्यापुढे लखनऊचे फलंदाज हतबल दिसले.

गुणतालिकेत पंजाबचा दबदबा

या दिमाखदार विजयामुळे पंजाब किंग्सने यंदाच्या मोसमातील प्लेऑफच्या दिशेने एक भक्कम पाऊल टाकले आहे. पंजाबने आतापर्यंत 6 सामने खेळले असून त्यापैकी 5 सामन्यांत विजय मिळवला आहे, तर एक सामना पावसामुळे रद्द झाला होता. 11 गुणांसह श्रेयस अय्यरचा संघ गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर विराजमान आहे.


दुसरीकडे, लखनऊ सुपर जायंट्ससाठी आता पुढचा रस्ता अत्यंत कठीण झाला आहे. 6 सामन्यांपैकी केवळ 2 सामन्यांत त्यांना विजय मिळवता आला असून, 4 गुणांसह ते आठव्या स्थानावर आहेत.

# केकेआरचा पहिलाच अन् घातक वार! राजस्थान गुडघ्यावर, पण मुंबई हादरलं,

आयपीएल 2026 च्या हंगामात सलग पराभवाचा धक्का सहन करणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्सने अखेर आपल्या विजयाचे खाते उघडले आहे. राजस्थान रॉयल्सविरुद्ध झालेल्या अटीतटीच्या सामन्यात रिंकू सिंग आणि अनुकूल रॉय या जोडीने अशक्य वाटणारा विजय खेचून आणला. या विजयामुळे गुणतालिकेत मोठी उलथापालथ झाली असून, मुंबई इंडियन्सची आता शेवटच्या स्थानी घसरण झाली आहे.केकेआरची झेप, मुंबई शेवटच्या स्थानी

या विजयानंतर गुणतालिकेत महत्त्वपूर्ण बदल पाहायला मिळत आहेत. 7 सामन्यांनंतर केकेआरने 1 विजय आणि 1 अनिर्णित सामन्यासह 3 गुण मिळवले आहेत. यामुळे केकेआरने 10 व्या स्थानावरून 9 व्या स्थानावर झेप घेतली आहे. दुसरीकडे, 5 सामन्यांत केवळ 1 विजय मिळवणारा मुंबई इंडियन्सचा संघ आता 2 गुणांसह थेट तळाला म्हणजेच 10 व्या स्थानी फेकला गेला आहे.

राजस्थानची संधी हुकली.राजस्थान रॉयल्सचा हा या हंगामातील दुसरा पराभव ठरला आहे. हा सामना जिंकला असता तर राजस्थानला पहिल्या क्रमांकावर पोहोचण्याची संधी होती, मात्र या पराभवानंतरही ते 8 गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर कायम आहेत. पंजाब किंग्स सध्या 9 गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी विराजमान आहे. रिंकू-अनुकूलची 'मॅजिक' जोडी.राजस्थानने प्रथम फलंदाजी करत 20 षटकांत 9 विकेट्स गमावून 155 धावा केल्या. प्रत्युत्तरात केकेआरची सुरुवात अत्यंत खराब झाली आणि 85 धावांवरच 6 विकेट्स पडल्या. सामना पूर्णपणे राजस्थानच्या बाजूने झुकला होता.मात्र, यानंतर रिंकू सिंह आणि अनुकूल रॉय यांनी अप्रतिम लढत देत सामना फिरवला. दोघांनी सातव्या विकेटसाठी केवळ 37 चेंडूत नाबाद 76 धावांची भागीदारी करत केकेआरला 19.4 षटकांत 6 विकेट्सवर 161 धावांपर्यंत पोहोचवले आणि संघाला अविश्वसनीय विजय मिळवून दिला.रिंकू सिंहने 34 चेंडूत 5 चौकार आणि 2 षटकारांसह नाबाद 53 धावा करत मॅच-विनिंग खेळी साकारली, तर अनुकूल रॉयने 16 चेंडूत 29 धावांची झटपट खेळी केली.




# सलग पराभवांच्या अंधारानंतर रिंकू सिंगने पेटवला केकेआरच्या विजयाचा दिवा; शेवटच्या 5 षटकात गेमच फिरवला



आयपीएल 2026 च्या हंगामात सलग अपयशाचा सामना करणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्सने अखेर विजयाचे खाते उघडले आहे. अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात रिंकू सिंग आणि अनुकूल रॉय या जोडीने अशक्य वाटणारा विजय खेचून आणत राजस्थान रॉयल्सचा चार गडी राखून पराभव केला. केकेआरचा या हंगामातील हा पहिलाच विजय ठरला आहे.

वैभव सूर्यवंशीची पुन्हा तुफानी फटकेबाजी

वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वाल यांनी राजस्थान रॉयल्ससाठी डावाची सुरुवात केली. त्यांनी 8.4 षटकांत पहिल्या विकेटसाठी 81 धावा जोडल्या. संघाची पहिली विकेट वैभवच्या रूपाने पडली. 6 चौकार आणि 2 षटकारांसह 28 चेंडूंमध्ये 46 धावा करून तो वेल्लियनच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याच्या पाठोपाठ ध्रुव जुरेल बाद झाला, त्याने 5 धावा केल्या. त्यानंतर यशस्वी जैस्वालही बाद झाला. त्याने 29 चेंडूंमध्ये 4 चौकार आणि 2 षटकारांसह 39 धावा केल्या. त्यानंतर संघाला रियार परागच्या (12) रूपाने चौथा धक्का बसला. शेवटी शिमरॉन हेटमर्नने 15 धावा केल्या आणि रवींद्र जडेजाने 9 धावांचे योगदान दिले. कार्तिक त्यागी आणि वरुण चक्रवतीर्ने कोलकाता नाईट रायडर्ससाठी सर्वाधिक 3-3 बळी घेतले.सलामीवीर स्वस्तात बाद, मधल्या फळीचा संघर्ष.धावांचा पाठलाग करताना कोलकाताची सुरुवात अत्यंत खराब झाली. सलामीवीर टीम सायफर्ट आणि कर्णधार अजिंक्य रहाणे भोपळा न फोडता स्वस्तात माघारी परतले. त्यानंतर अंगक्रिश रघुवंशी (10) आणि कॅमेरून ग्रीन (27) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र रवि बिश्नोई आणि रवींद्र जडेजाने त्यांना फार काळ टिकू दिले नाही. रॉवमन पॉवेलने 23 धावांची भर घातली, पण तो देखील मोक्याच्या क्षणी बाद झाला.अनुकूल अन् रिंकू सिंगने खिंड लढवली

केवळ 85 धावांवर सहा महत्त्वाचे फलंदाज तंबूत परतल्याने केकेआर हा सामना गमावणार असे चित्र दिसत होते. राजस्थानच्या गोलंदाजांनी सामन्यावर पूर्ण पकड मिळवली होती. सहा गडी बाद झाल्यानंतर मैदानात आलेल्या रिंकू सिंग आणि अनुकूल रॉय यांनी संयमी पण आक्रमक खेळी करत सामन्याचे चित्र पालटले. या जोडीने सातव्या विकेटसाठी नाबाद 76 धावांची अभूतपूर्व भागीदारी रचली. या जोडीच्या जिद्दीमुळे केकेआरने 19.4 षटकांत 6 गडी गमावून 161 धावा केल्या आणि हंगामातील आपल्या पहिल्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

# 6,6,6,6,6... पंजाबच्या कॉनोली अन् आर्याचा 'पॉवर शो', मार्करमची पिसं काढली! एकाच ओव्हरमध्ये 5 षटकार;

लखनऊ सुपर जायंट्स विरुद्धच्या सामन्यात एका ऐतिहासिक आणि स्फोटक षटकाची नोंद झाली आहे.एडन मार्करमने टाकलेले हे षटक 'एलएसजी'च्या इतिहासातील आतापर्यंतचे सर्वात महागडे षटक ठरले आहे, त्याने रवी बिश्नोईचा जुना विक्रम मोडीत काढला आहे.मार्करमच्या या षटकात एकूण 32 धावा वसूल करण्यात आल्या.षटकाच्या पहिल्याच चेंडूवर कॉनोलीने एक्स्ट्रा कव्हरवरून चेंडू टोलावत षटकाराने सुरुवात केली.षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर पुन्हा एकदा कॉनोलीने बॅट फिरवली आणि चेंडू लाँग-ऑनच्या वरून सीमापार धाडला.

# हा एक ग्लास ज्यूस त्वचेवरील निस्तेजपणा आणि सुरकुत्या दूर करेल



आजच्या धावपळीच्या जीवनशैलीचे आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींचे परिणाम सर्वात आधी आपल्या त्वचेवर दिसू लागतात, ज्यामुळे त्वचा निस्तेज आणि निर्जीव दिसू लागते. अशा परिस्थितीत ज्यूस हा एक खूप फायदेशीर पर्याय ठरू शकतो.बदलणारे हवामान, धूळ आणि प्रदूषण यांचा आपल्या त्वचेवर विनाशकारी परिणाम होतो. त्वचेची चमक परत मिळवण्यासाठी लोक अनेकदा महागडी सौंदर्य उत्पादने आणि पार्लरमधील उपचारांचा आधार घेतात, परंतु आरोग्य तज्ञांच्या मते खरी आणि चिरस्थायी चमक आतून येते, बाहेरून नाही. याच संदर्भात, सफरचंद, बीट आणि गाजर यांचे मिश्रण असलेला 'एबीसी ज्यूस' आजच्या पिढीमध्ये एक सौंदर्य पेय म्हणून झपाट्याने लोकप्रिय होत आहे.सफरचंद त्वचा कोमल ठेवतात

या जादुई रसातील मुख्य घटक सफरचंद आहे. सफरचंदात व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे शरीरातील कोलेजन प्रथिनाच्या निर्मितीस प्रोत्साहन देते. कोलेजन हा असा घटक आहे जो त्वचेची लवचिकता टिकवून ठेवतो आणि तिला सैल पडण्यापासून रोखतो. सफरचंदामधील अँटीऑक्सिडंट्स सुरकुत्या आणि बारीक रेषा यांसारखी वृद्धत्वाची चिन्हे कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच ते त्वचेला आर्द्र ठेवते आणि नैसर्गिक चमक देते.नैसर्गिक रक्त शुद्ध करणारा

बीटरूटला अनेकदा रक्तवर्धक मानले जाते, पण ते त्वचेसाठीही एक वरदान आहे. त्यात असलेले नायट्रेट्स रक्ताभिसरण सुधारतात. जेव्हा त्वचेच्या पेशींना पुरेसा ऑक्सिजन आणि पोषक तत्वे मिळतात, तेव्हा चेहरा आपोआप तेजस्वी दिसतो. शिवाय, बीटरूट यकृताला डिटॉक्सिफाय करण्यास मदत करते. शरीरातून विषारी घटक बाहेर टाकले गेल्याने, मुरुमे आणि डाग कमी होऊ लागतात.गाजरांमधून व्हिटॅमिन ए मिळेल

या रसाचा तिसरा आधारस्तंभ गाजर आहे. गाजर हे बीटा-कॅरोटीनचा खजिना आहे, ज्याचे शरीरात व्हिटॅमिन ए मध्ये रूपांतर होते. हे व्हिटॅमिन नवीन त्वचेच्या पेशींच्या निर्मितीसाठी आणि खराब झालेल्या उतींच्या दुरुस्तीसाठी आवश्यक आहे. व्हिटॅमिन ए त्वचेला कोरडे होण्यापासून वाचवते आणि तिला रेशमासारखी मुलायम ठेवते.

कधी सेवन करावे

एकत्र केल्यावर, या तिन्हींचा एक शक्तिशाली संयोग तयार होतो. आरोग्य तज्ञांच्या मते, सकाळी रिकाम्या पोटी हा रस पिणे सर्वात फायदेशीर आहे. यामुळे केवळ तुमची त्वचाच सुधारत नाही , तर तुमची रोगप्रतिकारशक्तीही वाढते आणि दृष्टीसाठीही हे चांगले आहे. प्रदूषण आणि सूर्यप्रकाशामुळे कमी झालेली त्वचेची चमक परत मिळवायची असेल, तर हा रस तुमच्या रोजच्या आहाराचा एक भाग नक्कीच असायला हवा.

# ऑफिसमध्ये तासनतास बसून पाठदुखीने त्रस्त आहात? दररोज फक्त ५ मिनिटे करा 'हे' व्यायाम; मिळेल कायमची सुटका



ऑफिसमध्ये तासनतास बसून काम करताना पाठदुखी ही खूप सामान्य समस्या आहे. चुकीची बसण्याची पद्धत, सतत एकाच स्थितीत राहणे यामुळे पाठीचे स्नायू आखडतात, ताण येतो आणि वेदना होतात. पण चांगली बातमी ही आहे की, दररोज फक्त ५ मिनिटे काही सोपे स्ट्रेचिंग आणि व्यायाम केल्याने खूप आराम मिळतो आणि दीर्घकाळासाठी सुटका मिळू शकते.हे व्यायाम खुर्चीवर बसूनच करता येतात, कोणतेही उपकरण लागत नाही आणि ऑफिसमध्ये सहज करता येतात. रोज २-३ वेळा (उदा. सकाळ, दुपार, संध्याकाळ) हे करा.१. (खुर्चीवर बसून पाठीचा ट्विस्ट): खुर्चीच्या काठावर सरळ बसून पाय जमिनीवर सपाट ठेवा.उजवा हात खुर्चीच्या मागच्या बाजूला किंवा डाव्या गुडघ्यावर ठेवा. डाव्या बाजूला हळूहळू शरीर फिरवा, डोके आणि मान देखील त्याच दिशेने. २०-३० सेकंद धरून ठेवा, खोल श्वास घ्या. दुसऱ्या बाजूला करा. प्रत्येक बाजूला २-३ वेळा. फायदे: पाठीची लवचिकता वाढते, ताण कमी होतो. - (मार्जारी गाय आसन - बसून): खुर्चीवर सरळ बसून दोन्ही हात गुडघ्यांवर ठेवा. श्वास घेताना छाती पुढे काढा, खांदे मागे, डोके वर. श्वास सोडताना पाठ गोल करा, मान खाली ८-१० वेळा हळूहळू करा. फायदे: पाठीचा कणा मोकळा होतो, खालच्या पाठीची वेदना कमी होते.३. (खांद्यांचा सिक्वीझ): खुर्चीवर सरळ बसून हात दोन्ही बाजूला ठेवा. खांद्याच्या ब्लेड्स (पाठीच्या मागे) एकमेकांकडे आणण्याचा प्रयत्न करा. ५-१० सेकंद धरून ठेवा, नंतर सोडा. १०-१५ वेळा करा. फायदे: पाठीचे वरचे स्नायू मजबूत होतात, खांदे आणि मानेचा ताण कमी होतो. ४. (मानेचे स्ट्रेच): डोके हळूहळू उजवीकडे फिरवा, १०-१५ सेकंद धरा. दुसऱ्या बाजूला करा. आता डाव्या कानाला डाव्या खांद्याकडे आणण्याचा प्रयत्न करा (हाताने हलकेच दाब देऊ शकता). प्रत्येक बाजूला २-३ वेळा. फायदे: मान आणि पाठीच्या वरच्या भागाची वेदना कमी होते.५. (खुर्चीवर पुढे वाकणे): खुर्चीवर बसून पाय थोडे पसरवा. पुढे वाकून हातांनी पाय किंवा जमिनीला स्पर्श करण्याचा प्रयत्न करा. २०-३० सेकंद धरा, खोल श्वास घ्या. ३-४ वेळा करा. फायदे: खालच्या पाठीचे स्नायू मोकळे होतात. हे व्यायाम नियमित केल्याने पाठदुखी कमी होऊन दीर्घकाळ टिकते. पण जर वेदना खूप तीव्र असेल किंवा स्लिप डिस्कसारखी समस्या असेल तर डॉक्टर किंवा फिजिओथेरपिस्टचा सल्ला घ्या.

# या 5 लोकांनी चॉकलेट खाऊ नये, आरोग्याला नुकसान होऊ शकते



चॉकलेट खाण्याचे तोटे: चॉकलेटचा फक्त उल्लेख केला की आनंद मिळतो. मुलांपासून ते प्रौढांपर्यंत सर्व वयोगटातील लोक त्याची चव चाखतात. डार्क चॉकलेट, मिल्क चॉकलेट आणि व्हाईट चॉकलेट आज अनेक फ्लेवर्स आणि प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत. संशोधनातून असेही दिसून आले आहे की डार्क चॉकलेटमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात, मूड सुधारतात आणि रक्ताभिसरण सुधारतात.पण प्रत्येक चवदार गोष्ट नेहमीच आरोग्यदायी नसते, विशेषतः जेव्हा चॉकलेटचा विचार केला जातो. काही लोकांसाठी, चॉकलेट खाणे फायदेशीर होण्यापेक्षा जास्त नुकसान करते. ते केवळ त्यांच्या आरोग्याला हानी पोहोचवू शकत नाही तर दीर्घकालीन आजार देखील वाढवू शकते. म्हणून, जर तुम्हाला किंवा तुमच्या ओळखीच्या एखाद्या व्यक्तीला खाली सूचीबद्ध केलेल्या आरोग्य समस्या असतील तर चॉकलेट खाणे टाळणे चांगले.1. मधुमेहींनी चॉकलेटपासून दूर राहावे

चॉकलेटमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते, विशेषतः दूध आणि पांढरे चॉकलेट. मधुमेहींसाठी, ही जास्त साखर रक्तातील साखरेची पातळी बिघडू शकते, ज्यामुळे हायपरग्लाइसेमिया किंवा इतर गुंतागुंत होऊ शकते. डार्क चॉकलेट थोडे आरोग्यदायी मानले जात असले तरी, त्यात साखर आणि कॅलरीज असतात. म्हणून, मधुमेहींनी चॉकलेट खाण्यापूर्वी त्यांच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.2. मायग्रेन ग्रस्तांसाठी चॉकलेट हे धोकादायक असू शकते

जर तुम्हाला मायग्रेनचा त्रास आणि वारंवार डोकेदुखी होत असेल तर चॉकलेट हा तुमच्यासाठी धोकादायक ठरू शकतो. चॉकलेटमध्ये टायरामाइन, फेनिलेथिलामाइन आणि कॅफिन सारखे घटक असतात, जे मायग्रेनला चालना देऊ शकतात. संशोधनात असे दिसून आले आहे की काही लोकांना चॉकलेट खाल्ल्यानंतर काही तासांतच डोकेदुखीचा त्रास होतो. म्हणून मायग्रेनच्या रुग्णांनी चॉकलेट टाळावे किंवा ते मर्यादित प्रमाणात सेवन करावे.2. मायग्रेन ग्रस्तांसाठी चॉकलेट हे धोकादायक असू शकते

जर तुम्हाला मायग्रेनचा त्रास आणि वारंवार डोकेदुखी होत असेल तर चॉकलेट हा तुमच्यासाठी धोकादायक ठरू शकतो. चॉकलेटमध्ये टायरामाइन, फेनिलेथिलामाइन आणि कॅफिन सारखे घटक असतात, जे मायग्रेनला चालना देऊ शकतात. संशोधनात असे दिसून आले आहे की काही लोकांना चॉकलेट खाल्ल्यानंतर काही तासांतच डोकेदुखीचा त्रास होतो. म्हणून मायग्रेनच्या रुग्णांनी चॉकलेट टाळावे किंवा ते मर्यादित प्रमाणात सेवन करावे.5. मुले आणि गर्भवती महिला


मुलांना चॉकलेट खूप आवडते, पण त्यात साखर आणि कॅफिनचे प्रमाण जास्त असल्याने त्यांच्या विकासावर परिणाम होऊ शकतो. जास्त चॉकलेट खाल्ल्याने हायपरॲक्टिव्हिटी, झोपेचा अभाव आणि दात किडणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. गर्भवती महिलांनीही जास्त चॉकलेट खाणे टाळावे, कारण त्यामुळे गर्भाच्या हृदय गती आणि झोपेवर परिणाम होऊ शकतो. जर तुम्हाला खरोखरच ते हवे असेल तर तुम्ही तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर मर्यादित प्रमाणात ते सेवन करावे.

# दररोज आल्याचा चहा पिण्याचे फायदे जाणून आश्चर्य होईल



चहामध्ये आल्याचा वापर केल्याने त्याची चव तर वाढतेच पण त्याचे आरोग्यासाठीही खूप फायदे होतात. हे पचन सुधारण्यास, सर्दी-खोकल्यावर उपचार करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते. भारतीय घरांमध्ये, दिवसाची सुरुवात चहाने करणे ही केवळ सवय नसून एक भावना असते. सकाळची थंडी असो किंवा वर्तमानपत्रातील बातम्या असोत, चहा प्रत्येक घरात संभाषणाचा आधार बनतो. आणि जर चहामध्ये आले मिसळले असेल तर त्याचा आनंद द्विगुणीत होतोकारण आल्याच्या चहामध्ये औषधी गुणधर्म असतात जे स्वादिष्ट आणि आरोग्यासाठी फायदेशीर असतात. म्हणूनच लोक सकाळी आल्याची चहा पिणे पसंत करतात. तर, आल्याचा चहा पिण्याचे फायदे जाणून घेऊया. आल्याच्या चहा पिण्याचे काय फायदे आहेत? भारतीय घरांमध्ये, सकाळची सुरुवात अनेकदा गरम आल्याच्या चहाने होते . ती केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. आल्याच्या चहाने दिवसाची सुरुवात केल्याने तुमच्या पचनशक्ती आणि रोगप्रतिकारक शक्तीवर थेट परिणाम होतो.कारण आल्याच्या चहामध्ये औषधी गुणधर्म असतात जे स्वादिष्ट आणि आरोग्यासाठी फायदेशीर असतात. म्हणूनच लोक सकाळी आल्याची चहा पिणे पसंत करतात. तर, आल्याचा चहा पिण्याचे फायदे जाणून घेऊया. आल्याच्या चहा पिण्याचे काय फायदे आहेत? भारतीय घरांमध्ये, सकाळची सुरुवात अनेकदा गरम आल्याच्या चहाने होते . ती केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. आल्याच्या चहाने दिवसाची सुरुवात केल्याने तुमच्या पचनशक्ती आणि रोगप्रतिकारक शक्तीवर थेट परिणाम होतो.सर्दी आणि खोकल्यासाठी रामबाण उपाय आल्याची चहा सर्दी, खोकला आणि फ्लूसाठी एक उत्तम घरगुती उपाय मानली जाते. त्यातील अँटीऑक्सिडंट्स शरीराला संसगार्शी लढण्यास मदत करतात आणि नाक बंद होणे आणि कफ कमी करण्यास मदत करतात. घसा खवखवणे आणि सूज कमी करते आल्याची चहा घशातील खवखव कमी करते आणि कफ बाहेर काढण्यास मदत करते. यामुळे घशातील खवखव कमी होते. यामुळे रक्ताभिसरण देखील सुधारते, ज्यामुळे शरीराच्या अवयवांना पोषक तत्वांचा योग्य पुरवठा होतो.वजन कमी करण्यास उपयुक्त वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी आल्याची चहा खूप फायदेशीर आहे. ती चयापचय वाढवते आणि कॅलरी बर्निंगला गती देते. नियमित सेवनाने चरबी जमा होण्याची शक्यता कमी होते. थकवा आणि ताण कमी करते जर तुम्हाला दिवसभर थकवा किंवा ताण जाणवत असेल, तर एक कप आल्याची चहा त्वरित आराम देऊ शकते. ती शरीराला ऊर्जा देते आणि मनाला ताजेतवाने करते. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आल्यामध्ये असलेले अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

# किडनीच्या रुग्णांनी या भाज्याचे सेवन करू नये, समस्या वाढेल



मूत्रपिंड हे आपल्या शरीरातील एक अवयव आहे जे रक्त स्वच्छ करण्यासाठी २४ तास अथकपणे काम करते. ते शरीरातील विषारी पदार्थ, जास्त पाणी आणि निरुपयोगी खनिजे काढून टाकून आपल्याला आतून निरोगी ठेवण्यास मदत करतात.पण आजकाल किडनी स्टोन ही एक सामान्य समस्या बनली आहे. यामागील एक कारण म्हणजे आपल्या चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि जीवनशैली. किडनी स्टोन टाळण्यासाठी दिवसभर भरपूर पाणी प्या आणि तुमच्या आहाराकडेही लक्ष द्या. या भाज्या किडनी स्टोनचा त्रास वाढवू शकतात. चला जाणून घेऊ या.पालक पालक आरोग्यासाठी खूप फायदेशीर असला तरी, असे म्हटले जाते की कोणत्याही गोष्टीचा अतिरेक चांगला नसतो. म्हणून, पालक नेहमी माफक प्रमाणात खावा. पालकामध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते, म्हणून तुम्ही ते माफक प्रमाणात सेवन करावे.वांगी वांगी देखील टाळावी . वांग्याच्या बियांमध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते. म्हणून, जास्त प्रमाणात वांगी खाल्ल्याने किडनी स्टोन तयार होण्याचा धोका वाढू शकतो. जर तुम्हाला आधीच किडनी स्टोनची समस्या असेल तर तुम्ही ते कमी प्रमाणात सेवन करावे.टोमॅटो आरोग्य तज्ञांच्या मते, किडनी स्टोनच्या रुग्णांनी टोमॅटो टाळावेत. टोमॅटोमध्ये ऑक्सलेट्स देखील असतात, ज्यामुळे किडनी स्टोनचा धोका वाढू शकतो. काकडी काकडी जे बहुतेकदा सॅलडमध्ये खाल्ले जातात, ते आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तथापि, जास्त प्रमाणात सेवन करणे हानिकारक असू शकते. काकडीच्या बियांमध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते, जे एक सेंद्रिय संयुग आहे जे किडनी स्टोनचा धोका वाढवू शकते.बटाटे काही सामान्य भाज्यांमध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे किडनी स्टोन होऊ शकतो. यामध्ये बटाटे आहे. किडनी स्टोनच्या रुग्णांनी बटाट्याचे सेवन कमी करावे. सोयाबीन काही सामान्य भाज्यांमध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे किडनी स्टोन होऊ शकतो. यामध्ये सोयाबीनचा समावेश आहे. जर तुम्ही त्यांचे दररोज सेवन केले तर ते तुमच्या मूत्रपिंडांसाठी थोडे हानिकारक ठरू शकतात. शिवाय, ज्या लोकांना आधीच किडनी स्टोनचा त्रास आहे त्यांनी या गोष्टींचे सेवन करणे टाळावे.

# पोट आणि आतड्यांच्या आरोग्यासाठी दररोज 1 केळी खाण्याचे फायदे जाणून घ्या



दररोज एक केळी खाल्ल्याने पोट आणि आतडे निरोगी राहण्यास मदत होते. फायबर आणि प्रीबायोटिक गुणधर्मांनी समृद्ध असलेले केळी आतड्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत करते. दररोज एक केळी खाण्याचे फायदे जाणून घ्या.एक म्हण आहे दररोज एक सफरचंद खा आणि डॉक्टरला दूर ठेवा.पण तुम्हाला माहित आहे का की दररोज एक केळी खाल्ल्याने तुमचे आरोग्य सुधारू शकते आणि डॉक्टरला दूर ठेवता येते? आरोग्य तज्ञांच्या मते, केळी केवळ चवीला गोड नसतात, तर त्यात फायबर आणि पोटॅशियम देखील भरपूर असते, जे पोट आणि आतड्यांच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात.दररोज एक केळी खाल्ल्याने पोटाचे कार्य सुधारते आणि शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळतात. दररोज 1 केळी खाण्याचे फायदे जाणून घ्या. केळीमध्ये पोटॅशियम, व्हिटॅमिन बी6 आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर केळीमध्ये प्रतिरोधक स्टार्च आणि प्रीबायोटिक फायबर भरपूर प्रमाणात असते. ते आतड्यांमध्ये असलेल्या सकारात्मक बॅक्टेरियांना पोषण देते. दररोज केळी खाल्ल्याने पोटाचे आवरण मजबूत होते आणि जळजळ कमी होते. अनेक संशोधनांनुसार, कच्च्या केळ्यामध्ये अल्सरविरोधी गुणधर्म देखील आढळतात. हे पोटाचे आरोग्य दीर्घकाळ टिकवून ठेवण्यास मदत करते आणि आतड्यांचे आरोग्य सुधारते. रक्तदाब नियंत्रित करण्यास प्रभावी केळीमध्ये पोटॅशियम मोठ्या प्रमाणात आढळते, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. त्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करतात. भूक लागल्यावर केळी नाश्ता म्हणून खाल्ल्याने शरीराला आवश्यक ऊर्जा मिळते.केळी हा एक सोपा आणि चविष्ट नाश्ता आहे. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचे आवडते फळ. ते दररोज खाल्ल्याने ऊर्जा, पचन आणि हृदयाचे आरोग्य सुधारते. दररोज एक केळी खाल्ल्याने तुमचे पोट आणि आतडे निरोगी राहतातच, शिवाय रक्तदाब नियंत्रित करण्यास, ऊर्जा वाढविण्यास आणि आतड्यांचे आरोग्य सुधारण्यासकदेखील मदत होते.

# चॉकलेट खाण्याचे 7 आरोग्यदायी फायदे येथे जाणून घ्या



आज बाजारात अनेक प्रकारचे चॉकलेट उपलब्ध आहेत, परंतु डार्क चॉकलेट सर्वोत्तम आहे. त्यात साखर कमी असते किंवा अजिबात नसते, ज्यामुळे ते तुमच्या आरोग्यासाठी सर्वात फायदेशीर ठरते.आपल्या सर्वांना माहित आहे की चॉकलेट हे केवळ मुलांचे आणि तरुणींचे आवडतेच नाही तर ते सर्वत्र आवडते. वाढदिवस किंवा खास प्रसंगी ते एक उत्तम भेट आहे. आजकाल, ते इतके आकर्षक आणि वैविध्यपूर्ण चवींमध्ये उपलब्ध आहे की तुम्हाला हवे असले तरीही तुम्ही ते टाळू शकत नाही. चॉकलेटचे आरोग्यदायी फायदे

१. ताण/नैराश्य - हो, जर तुम्ही कोणत्याही प्रकारच्या ताणतणावात असाल, तर चॉकलेट हा तुमचा परिपूर्ण साथीदार आहे, जो एक शब्दही न बोलता तुमचा ताण कमी करू शकतो. जेव्हा जेव्हा तुम्ही ताणतणाव किंवा नैराश्यात असाल तेव्हा चॉकलेट खाण्यास विसरू नका. ते तुम्हाला आरामदायी वाटण्यास मदत करेल. २. तरुण त्वचा - चॉकलेटमध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात, जे तुमच्या त्वचेवरील वृद्धत्वाची लक्षणे आणि सुरकुत्या कमी करण्यास मदत करतात. यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. त्याच्या गुणधर्मांमुळे, चॉकलेट बाथ, फेशियल, पॅक आणि मेण आता लोकप्रिय आहेत

३. कमी रक्तदाबासाठी फायदेशीर - कमी रक्तदाब असलेल्यांसाठी चॉकलेट अत्यंत फायदेशीर आहे. रक्तदाब कमी झाल्यावर चॉकलेट तात्काळ आराम देते. म्हणून, नेहमी चॉकलेट सोबत ठेवा. ४. कोलेस्ट्रॉलसाठी फायदेशीर - शरीरातील एलडीएल कोलेस्ट्रॉल किंवा वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी चॉकलेट खूप फायदेशीर आहे. एलडीएल कोलेस्ट्रॉल कमी करून, ते लठ्ठपणा आणि त्यामुळे होणाऱ्या इतर आजारांवर नियंत्रण ठेवण्यास देखील मदत करते. ५. ॲथेरोस्क्लेरोसिस - ॲथेरोस्क्लेरोसिस हा एक आजार आहे ज्यामध्ये धमन्या कडक होतात किंवा अरुंद होतात, ज्यामुळे त्या ब्लॉक होतात. या स्थितीत चॉकलेट अत्यंत फायदेशीर आहे.



# तन्वी कोलते बिग बॉस विनर! सीजन 6 गाजवून महाट्रॉफी नावावर, राकेश बापट उपविजेता

11 जानेवारी 2026 रोजी कलर्स मराठीवर सुरू झालेल्या बिग बॉस मराठी सिझन 6ने प्रेक्षकांचं भरभरुन मनोरंजन केलं. 19 एप्रिल रोजी सहाव्या सिझनचा ग्रँड फिनाले उत्साहात पार पडला. 100 दिवसांच्या या खेळात 5ही स्पर्धकांनी आपली जागा निर्माण केली होती. टॉप 5 स्पर्धकांमधून कोणता स्पर्धक ट्रॉफी जिंकणार? याकडे सर्वांच्याच नजरा लागल्या होत्या. अखेर याचं उत्तर मिळालं. तगड्या स्पर्धकांना मागे टाकत, तन्वी कोलते हिने बाजी मारली. प्रेक्षकांकडून मिळालेल्या मतांच्या जोरावर आणि उत्कृष्ट टास्क परफॉर्मन्समुळे या स्पर्धकाने बिग बॉसच्या ट्रॉफीवर आपलं नाव कोरलं. त्यामुळे तन्वी कोलतेवर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

अभिनेता रितेश देशमुखे याने होस्ट केलेला यंदाचा बिग बॉसचा सिझन प्रचंड गाजला. विशेष म्हणजे भाऊचा धक्का या एपिसोडला प्रेक्षकांकडून विशेष प्रेम मिळालं. टॉप 5 स्पर्धकांची नावे जाहीर होताच, प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. टॉप 5 स्पर्धकांमध्ये तन्वी कोलतेला तिकीट टू फिनालेचा मान मिळाला होता. तन्वी कोलते, राकेश बापट, अनुश्री माने, दिपाली सय्यद आणि विशाल कोटियन हे स्पर्धक रेसमध्ये होते. पाचही स्पर्धकांनी मास्टरमाईंडने प्रत्येक टास्क पूर्ण केले. शेवटी 2 स्पर्धक उरले होते. तन्वी कोलतेने सहाव्या सिझनच्या ट्रॉफीवर आपलं नाव कोरलं. 17 स्पर्धकांमध्ये सुरू झालेल्या प्रवासात काही स्पर्धकांची वाईल्ड कार्ड एन्ट्रीही झाली. तगड्या स्पर्धकांनी टास्क खेळून अनेकांनी आपल्या बाजूने मत वळवून घेतलं. मात्र, तरीही शांत, सयंमाने तन्वी कोलतेने ट्रॉफीपर्यंत प्रवास पूर्ण केला. बिग बॉस मराठीचा सहावा सिझन रंजक ठरला, पुरेपूर या सिझनने मनोरंजन केलं, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

सुरुवातीपासून शांत सयंमीपणे टास्क खेळणाऱ्या तन्वीने बिग बॉसच्या ट्रॉफीवर आपलं नाव कोरलं. तिनं राकेश बापटला मागे टाकत तिकीट टू फिनालेचा मान पटकावला. तन्वीच बिग बॉसची ट्रॉफी जिंकणार, असा अनेकांनी अंदाज वर्तवला होता. तिला प्रेक्षकांसह घरातील स्पर्धकांचाही पाठिंबा होता.

# सगळ्यांसमोरच राखीची तन्वीला हिंदी बिग बॉसची ऑफर



गेल्या काही दिवसांपासून ज्याची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत होते तो बिग बॉसचा महाअंतिम सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. गेल्या १०० दिवसांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करणाऱ्या या पवार्चा अखेर शेवट झालाय. तन्वी कोलते हिला बिग बॉस मराठीच्या सहाव्या पवार्ची ट्रॉफी मिळाली.100 दिवस सदस्यांनी कॅमेरांच्या नजरकैदेत राहत मैत्री, वाद, भावनिक चढ-उतार आणि स्पधेर्चे अनेक रंग अनुभवले. प्रत्येक सदस्याचा खरा स्वभाव प्रेक्षकांसमोर आला आणि या प्रवासाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले. तन्वी जिंकणार असं पहिल्यापासून अनेकजण म्हणत होते. यात राखी सावंतचंही नाव होतं. राखीचा अंदाज खरं ठरलाय. तन्वी जिंकली. त्यांनतर राखीने तिच्यासोबत **Video** करत सगळ्यांसमोर थेट हिंदी बिग बॉसची ऑफर दिलीय. 'मी परत **Wild Card** एन्ट्री घेत हिची वाट लावेन 'असं म्हणत तिने सलमान खानला थेट तन्वीला ॅल्र्ल बिग बॉसमध्ये घेण्यासाठी सांगितलं.माझ्या जिभेवर तीळ, तन्वीला दिली थेट हिंदी बिग बॉसची ऑफर

हातात ट्रॉफी घेतलेल्या तन्वीसोबत व्हीडिओ करत राखीने तन्वीला हिंदी बिग बॉसची ऑफर दिली. ती म्हणाली,मी सगळ्यांना बोलले होते पहिल्या दिवसापासून की तन्वी जिंकणार. माझ्या जीभेवर तीळ आहे. बोलले होते मी हिला. ' यावर तन्वी म्हणते 'राखीच्या जिभेवर तीळ आहे. आणि राखीकडे फार मोठं मन आहे. राखी मला म्हणाली होती की मी जिंकणार. बघा शंभर दिवसांनंतर आता माझ्या हातात ट्रॉफी आहे. आणि मी विजेती झालेय. यावर लगेच राखी म्हणते,' सलमान भाई, तन्वी हिंदी बिग बॉसमध्ये जायला पाहिजे. आणि तेव्हा मी वाईल्ड कार्ड म्हणून येईल आणि तिची वाट लावेन ' असं ती म्हणाली. यावर तन्वीसह सगळेच हसले.तन्वी कोलते कोण आहे?

तन्वी कोलते ही महाराष्ट्रातील एक सोशल मीडिया इन्फ्लुएंसर, मॉडेल आणि कंटेंट क्रिएटर म्हणून ओळखली जाते. ती प्रामुख्याने इंस्टाग्रामवर रील्स, फॅशन, लाइफस्टाइल आणि रिलेटेबल व्हिडीओमुळे प्रसिद्ध झाली. सोशल मीडियावर तिच्या एक्सप्रेसिव्ह स्टाइल आणि नैसर्गिक अभिनयामुळे तिला मोठी लोकप्रियता मिळाली. तिच्या असलेल्या फॉलोअर्सच्या संख्येमुळे अनेक ब्रँड्सने तिच्यासोबत कोलॅबोरेशन केलं. तन्वीच्या फॅशन आणि लाइफस्टाइल कंटेंटमुळे तरुणांमध्ये मोठा फॅनबेस तयार झाला आहे. बेधडक स्वभावामुळे बिग बॉसच्या घरात तन्वीची वेगळी ओळख निर्माण झाल्याचं दिसून आलं. कॉन्फिडन्स, स्ट्रेटफॉरवर्ड ॲटिट्यूड हे तन्वीच्या स्वभावाचे खास वैशिष्ट्य आहे. त्याचमुळे तन्वीने आता बिग बॉस मराठी सीजन 6 चे विजेतेपद पटकावल्याचं दिसतंय.




# बिग बॉस मराठीने माझं नाव मोठं केलं, आता 'तन्वी कोलते ब्रँड' बनून जात आहे;

मुंबई : 'बिग बॉस मराठी सिझन 6' चा बहुप्रतिक्षित महाअंतिम सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. गेल्या 100 दिवसांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करणाऱ्या या पवार्चा अखेर भव्य शेवट झाला असून तन्वी कोलते हिने विजेतेपद पटकावत 'महाविजेती'चा मान मिळवला. बिग बॉसच्या घरी तन्वी कोलते म्हणून आले होते, आता बाहेर जाताना 'तन्वी कोलते ब्रँड' म्हणून जात आहे, बिग बॉस मराठीने माझं नाव मोठं केलं, अशी पहिली प्रतिक्रिया तन्वी कोलते हिने दिली.

कलर्स मराठी वाहिनीवर प्रसारित झालेल्या या सिझनने सुरुवातीपासूनच प्रेक्षकांची मने जिंकली होती. अंतिम क्षणापर्यंत उत्कंठा कायम असताना विजेतेपदाची घोषणा होताच वातावरण जल्लोषात न्हाऊन निघाले.तन्वी कोलतेने संपूर्ण सिझनमध्ये आपल्या स्पष्टवक्तेपणा, जिद्द आणि सातत्यपूर्ण खेळाच्या जोरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. प्रेक्षकांशी जुळलेले नाते आणि ठाम भूमिका यामुळे तिने हा किताब पटकावला.विजेत्याला कलर्स मराठीकडून 15 लाख रुपयांची रोख रक्कम आणि ट्रॉफी देण्यात आली. याशिवाय पु. ना. गाडगीळ अँड सन्स तर्फे 10 लाख रुपयांचे वाउचर, रेवा डायमंड ज्वेलरी खरेदीसाठी सुविधा आणि तुनवाल ई मोटर्स कडून 'लिथिनो प्रो' ई-बाईक देण्यात आली.विजेती ठरल्यानंतर तन्वी कोलते म्हणाली की, हा प्रवास तिच्यासाठी खूप खास होता. प्रेक्षकांनी दिलेलं प्रेम हीच माझी ताकद आहे. हा विजय मी माझ्या कुटुंबाला आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला समर्पित करते, असे ती म्हणाली.

तन्वी कोलते म्हणाली की, हा प्रवास माझ्यासाठी खूप खास आणि शिकवणारा ठरला. या घराने मला स्वतःला ओळखायला शिकवलं, प्रत्येक परिस्थितीत ठाम राहायला शिकवलं. प्रेक्षकांनी दिलेलं प्रेम आणि पाठिंबा हीच माझी खरी ताकद आहे. हा विजय मी माझ्या कुटुंबाला आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला समर्पित करते. मला सगळे घरात बोलत होते, विचारत होते काय काम केलंस? तेव्हा वाईट वाटायचे. पण मी ठरवलं होतं या घरातून बाहेर पडेन तेव्हा सगळ्यांच्या तोंडी माझंच नावं असेल. बिग बॉस मराठीने माझं नाव मोठं केले आहे, आले होते तन्वी कोलते म्हणून, बाहेर जात आहे ते तन्वी कोलते हा ब्रँड बनून'.या घरात 100 दिवस सदस्यांनी कॅमेरांच्या नजरकैदेत राहत मैत्री, वाद, भावनिक चढ-उतार आणि स्पर्धेचे अनेक रंग अनुभवले. प्रत्येक सदस्याचा खरा स्वभाव प्रेक्षकांसमोर आला आणि या प्रवासाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले.जिओस्टार मराठी क्लस्टरचे कार्यकारी उपाध्यक्ष सतीश राजवाडे यांनी सांगितले की, या सिझनने प्रेक्षकांना वेगळा अनुभव दिला. अनपेक्षित ट्विस्ट, नात्यांतील बदल आणि संघर्षामुळे हा प्रवास विशेष ठरला. 'बिग बॉस मराठी 6'ने पुन्हा एकदा महाराष्ट्रातील प्रेक्षकांमध्ये आपली वेगळी छाप उमटवली. मनोरंजन, भावना आणि स्पधेर्चा संगम असलेला हा सिझन प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहणार आहे.

# पाच लाखांची पैशांची बॅग खाली ठेवली; बिग बॉसच्या घरातून बाहेर पडताच दिपाली सय्यदची पहिली पोस्ट,



सध्या बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाच्या महाअंतिम सोहळ्याची एकच चर्चा आहे. राकेश, विशाल,अनुश्री, आणि दिपाली या **Top** 4 सदस्यांना मागे टाकत तन्वी कोलतेनं बिग बॉसची ट्रॉफी उचलली. यात सर्वात कमी मतं मिळालेल्या दिपालीची विजेती होण्याची संधी हुकली . 5 लाख रुपयांचं बक्षीसही गेलं. बिग बॉसच्या घरातून बाहेर पडतात दिपाली सय्यदने सोशल मीडियावर पहिली पोस्ट केली आहे .

बिग बॉसच्या घराबाहेर पडताच दिपाली सय्यदची पोस्ट

बिग बॉस मराठीच्या सहाव्या पवार्चा काल महाअंतिम सोहळा पार पडला. शंभर दिवसांच्या प्रवासानंतर दिपाली सय्यद पाचव्या क्रमांकावर एलिमिनेट झाली. त्यानंतर अनुश्री माने घराबाहेर पडली. पण महाअंतिम सोहळ्यातील सर्वात मोठा ट्विस्ट म्हणजे रितेश देशमुख ने पैसे घेऊन स्वतःला एलिमिनेट करण्याची ऑफर दिलेली. आधी ही ऑफर तीन लाख रुपयांची होती. नंतर ती वाढवून चार लाख रुपये आणि शेवटी पाच लाख रुपये झाली. पण **Top** 5 मधील सर्व स्पर्धकांनी ही ऑफर नाकारली. शेवटी पाचव्या क्रमांकावर दिपाली सय्यदने फिनालेमधून निरोप घेतला. घरातून बाहेर आल्यानंतर दिपाली सय्यदने सोशल मीडियावर पोस्ट केली आहे.ती म्हणाली,' टॉप फाइव्ह पर्यंतचा हा प्रवास माझ्यासाठी केवळ एक खेळ नव्हता, तर ते माझ्या आयुष्यातील एक मोठा स्वप्न होतं. थँक्यू बिग बॉस मला ही संधी दिल्याबद्दल आणि स्वतःला सिद्ध करण्याची ताकद दिल्याबद्दल.! माझ्या लाडक्या प्रेक्षकांनो, तुमच्या अफाट प्रेमामुळे आणि सपोर्टमुळेच मी इथंवर पोहोचू शकले. तुम्ही दिलेला प्रत्येक वोट आणि दाखवलेला विश्वास हीच माझी खरी ट्रॉफी आहे. माझ्या पाठीशी खंबीरपणे सर्व उभे राहिले, त्या सगळ्यांचे मनापासून आभार. प्रवास संपला असला तरी या आठवणी कायम काळजात राहतील. हे प्रेम असंच कायम राहू द्या. ' असं दिपाली सय्यद म्हणाली.चाहत्यांच्या कमेंट्स. दिपालीच्या या पोस्टवर चाहत्यांनी भरभरून कमेंट्स करत तिचा बिग बॉसमधील प्रवास चांगला झाल्याचं तिला कळवलंय. अनेकांनी ह्यापाच लाख मिळाले असते पण मोठी चूक केलीस. ह्य आपलेच गद्दार निघाले आता तरी समज, बाहेर आल्यावर त्यांची बाजू घेऊ नकोस अशा कमेंट्स केल्याचं पाहायला मिळत आहे.

# कोण आहे तन्वी कोलते? बोल्ड आणि कॉन्फिडंट... Bigg Boss महाट्रॉफी जिंकण्यापर्यंतचा प्रवास कसा होता?

बिग बॉस मराठीच्या सीजन 6 मध्ये तिकीट टू फिनालेचा मान मिळवलेल्या तन्वी कोलते हिने महाट्रॉफी जिंकली आहे. सुरुवातीलपासूनच स्ट्राँग आणि बिनधास्त खेळणाऱ्या तन्वी कोलतेने ही ट्रॉफी आपल्या नावावर केली आहे. बिग बॉस मराठीचा सहावा सिझन रंजक ठरला आणि त्यामध्ये तन्वी कोलतेचा प्रवास हा उत्कृष्ठ ठरला. सोशल मीडियावर प्रसिद्ध असलेल्या तन्वीच्या या यशामुळे तिच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे.


बिग बॉसच्या विजेतेपदासोबत तन्वी कोलतेला कलर्सकडून 15 लाखांचा धनादेश आणि ट्रॉफी प्रदान करण्यात आली. त्याचसोबत पु. ना. गाडगीळ आणि सन्स तर्फे तब्बल 10 लाख रुपयांचं व्हाऊचर आणि तुनवाल ई मोटर्सची लिथीनो प्रो ही ई बाईक देण्यात आली. रितेश देशमुख यांच्याकडून आणि 'राजा शिवाजी' चित्रपटाच्या टीमकडून छत्रपती शिवाजी महाराज यांचा सुंदर फोटोही देण्यात आला. तन्वी कोलते ही महाराष्ट्रातील एक सोशल मीडिया इन्फ्लुएंसर, मॉडेल आणि कंटेंट क्रिएटर म्हणून ओळखली जाते. ती प्रामुख्याने इंस्टाग्रामवर रील्स, फॅशन, लाइफस्टाइल आणि रिलेटेबल व्हिडीओमुळे प्रसिद्ध झाली.तन्वीने तिने शिक्षण पूर्ण केल्यानंतर डिजिटल कंटेंट क्रिएशनकडे वळण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला तिने छोटे व्हिडिओ आणि ट्रेंडिंग रील्स बनवून प्रेक्षकांचे लक्ष वेधले. सोशल मीडियावर तिच्या एक्सप्रेसिव्ह स्टाइल आणि नैसर्गिक अभिनयामुळे तिला मोठी लोकप्रियता मिळाली. तिच्या असलेल्या फॉलोअर्सच्या संख्येमुळे अनेक ब्रँड्सने तिच्यासोबत कोलॅबोरेशन केलं. तन्वीच्या फॅशन आणि लाइफस्टाइल कंटेंटमुळे तरुणांमध्ये मोठा फॅनबेस तयार झाला आहे.इंस्टाग्रामवरील व्हायरल रील्स आणि ट्रेंडिंग कंटेंट

तिची बोल्ड आणि कॉन्फिडंट पर्सनॅलिटी

रिलेटेबल आणि एंटरटेनिंग व्हिडीओ मध्ये प्रवेश केल्यानंतर सुरुवातीपासूनच तन्वी कोलतेचा स्ट्राँग आणि बिनधास्त गेम प्ले दिसून आला. इतर स्पर्धकांसोबत वाद आणि स्पष्ट भूमिका यामुळे ती चर्चेत राहिली. बिग बॉसमध्ये दिलेल्या टास्कमध्ये तिचा ॲक्टिव्ह सहभाग दिसून आला. तसेच बेधडक स्वभावामुळे बिग बॉसच्या घरात तन्वीची वेगळी ओळख निर्माण झाल्याचं दिसून आलं. कॉन्फिडन्स, स्ट्रेटफॉरवर्ड ॲटिट्यूड हे तन्वीच्या स्वभावाचे खास वैशिष्ट्य आहे. त्याचमुळे तन्वीने आता बिग बॉस मराठी सीजन 6 चे विजेतेपद पटकावल्याचं दिसतंय.

तन्वी कोलते ही नव्या पिढीतील डिजिटल स्टार असून बिग बॉसच्या प्लॅटफॉर्ममुळे तिची लोकप्रियता आणखी वाढत आहे. तिचा स्वभाव आणि व्यक्तिमत्व पाहता ती पुढेही चर्चेत राहण्याची शक्यता आहे.





# मुंबईत कोर्ट मॅरेज केल्यानंतर 44 वर्षीय मराठी अभिनेत्रीचं उत्तराखंडमध्ये विधिवत लग्न; फोटो पोस्ट करत म्हणाली..





अनेक दर्जेदार मालिका, सिनेमांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करणारी अभिनेत्री नंदिता पाटकर गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे तिच्या लग्नामुळे. वयाच्या 44 व्या वर्षी अभिनेत्रीने मुंबईत कायदेशीर पद्धतीने लग्न केलं. आता नवऱ्यासोबत उत्तराखंडमधील त्रियुगीनारायण मंदिरात तिने विधिवत लग्न केलं आहे. सोशल मिडीयावर पोस्ट करत तिने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. नंदितानं नाट्य दिग्दर्शक विपुल महागावकर यांच्याशी आपली साताजन्माची गाठ बांधली आहे.नंदिता पाटकरने 'एलिझाबेथ एकादशी' सिनेमात काम केलं. स्टार प्रवाहच्या 'सहकुटुंब सहपरिवार' या मालिकेमुळे घराघरांत एक वेगळी ओळख मिळाली. याशिवाय नंदिताने 'खारी बिस्किट', 'लालबागची राणी' या सिनेमांमध्येही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत.उत्तराखंडमधील त्रियुगीनारायण मंदिरात बांधली लग्नगाठ सध्या नंदिता पाटकर तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. मुंबईत कोर्ट पद्धतीने लग्न केल्यानंतर उत्तराखंडमधी त्रियुगीनारायण मंदिरात तिनं लग्नगाठ बांधली आहे. इंडस्ट्रीत येण्यापूर्वीच नंदिताचं लग्न झालेलं, पण पुढे काही दिवसांतच संसार मोडला आणि तिचा घटस्फोट झाला. आता नंदितानं दुसऱ्यांदा आपली लग्नगाठ बांधली असून आपल्या नव्या संसाराला सुरुवात केलीय. अभिनेत्री नंदिता पाटकर आणि नाट्य दिग्दर्शक विपुल महागावकर दोघांचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. फोटोमध्ये दोघेही नवविवाहित दाम्पत्याच्या वेशात दिसत आहेत. जांभळ्या रंगाची सुंदर साडी, हातात हिरव्या बांगड्या, केसात गजरा या लूकमध्ये नंदिता खूपच सुंदर दिसत होती. तिने पोस्ट करत आपल्या भावना व्यक्त केल्या.ती म्हणाली काही क्षण आपण प्लॅन करतो, तर काही क्षण आपल्यासाठी आधीच ठरलेले असतात. आणि हा त्यापैकीच एक खास क्षण होता. एखाद्या व्यक्तीवर विश्वास ठेवणं, आपले कवच खाली ठेवणं सोपं नव्हतं. पण हळूहळू ते आपोआप घडलं आणि आम्ही दोघांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला.अशा ठिकाणी, जे स्त्री आणि पुरुषाच्या पवित्र मिलनाचं प्रतीक आहे. जरी तिथे जाण्याचं स्वप्न आम्ही नेहमीच पाहिलं असलं, तरी ते खरंच साकार झालं तेव्हा सगळंच अविश्वसनीय वाटलं. त्रियुगीनारायण मंदिर येथे सर्व धार्मिक विधींनी लग्न करणं हा शब्दात न मावणारा अनुभव होता.खूप आभारी आणि **blessed** वाटतंय असं तिने म्हटलं.